मंगळवार
०२
जून २०२६

पुणे
पाने : ४
अंक : ३०४
वर्ष : ५
किंमत : रू.५/-

मुख्य संपादक : डि.एस.लोखंडे पाटील
epaper.chaluwartha.com
www.chaluwartha.com
RNI No.: MAHMAR/2021/82895

# दैनिक चालु वार्ता

**तापमान**
दिवस : 39° उच्च
रात्र : 23° किमान
सूर्योदय : १२ तास ५८ मिनिटे
उगवणे :06:02 AM
मावळणे :07:00 PM
सूर्यास्त : १२ तास ३१ मिनिटे
उगवणे : 03:02 AM
मावळणे : 03:33 PM

**LIVE**
24k सोने प्रति १० ग्रॅम
रू.१,५६,२२०/-
22k सोने प्रति १० ग्रॅम
रू. १,४३,२००/-
चांदी प्रति किलो
रू. २,८०,०००/-
डॉलर प्रति दर
रू.९५.९२



## देश विदेश थोडक्यात

## आमच्यावर अन्याय झाला...

### RCB चॅम्पियन होताच मुख्यमंत्री डी.के. शिवकुमार भडकले; आयोजकांवर केले आरोप...



**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** आयपीएल २०२६ च्या महाअंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने गुजरात टायटन्सचा पराभव करत सलग दुसऱ्यांदा ट्रॉफीवर आपले नाव कोरले. संपूर्ण देशभरातील आरसीबीचे फॅन्स या ऐतिहासिक विजयाचा जल्लोष साजरा करत असतानाच, कर्नाटकचे मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डी. के. शिवकुमार यांचे एक मोठे आणि वादग्रस्त विधान समोर आले आहे. आरसीबीच्या या जेतेपदावर त्यांनी आनंद व्यक्त केला असला, तरी फायनल सामन्याचे ठिकाण (वेन्यू) गुजरातला हलवल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी जाहीर केली आहे.

**राजकारणामुळे फायनल मॅच गुजरातला नेली !**

पत्रकारांशी बोलताना डी.के. शिवकुमार यांनी थेट आयोजकांवर निशाणा साधला. ते म्हणाले, आयपीएल २०२६ चा फायनल सामना हा बंगळुरुमध्येच खेळवला जायला हवा होता. आमच्यावर आणि कर्नाटकवर हा घोर अन्याय झाला आहे. निव्वळ राजकारणामुळे या सामन्याचे ठिकाण बदलून तो दुसऱ्या राज्यात (गुजरात) शिफ्ट करण्यात आला. या विषयावर मी आता यापेक्षा जास्त काही बोलणार नाही.

ते पुढे म्हणाले, जर हा महामुकाबला बंगळुरुच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर झाला असता, तर कर्नाटकच्या चाहत्यांसाठी तो अत्यंत अभिमानाचा आणि संस्मरणीय क्षण ठरला असता. आपल्या घरच्या संघाला घरच्या मैदानावर सलग दुसऱ्यांदा चॅम्पियन बनताना पाहणे चाहत्यांसाठी खूप रोमांचक राहिले असते. तरीही, सर्व आरसीबी फॅन्स आणि कर्नाटक सरकारच्या वतीने मी संघाचे मनापासून अभिनंदन करतो. मैदानाबाबत नाराजी व्यक्त केल्यानंतर त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वरही (ट्विटर) पोस्ट शेअर करत आरसीबीचे कौतुक केले.

**आरसीबीची 'एलिट क्लब'मध्ये एन्ट्री; मुंबई-चेन्नईच्या विक्रमाशी बरोबरी!**

अहमदाबाद येथे झालेल्या या खिताबी सामन्यात आरसीबीने गुजरात टायटन्सचा ५ विकेट्सने पराभव केला. या विजेतेपदासह आरसीबीने सीएसके आणि मुंबई इंडियन्सच्या (एका खास 'एलिट क्लब'मध्ये प्रवेश केला आहे. आयपीएलच्या इतिहासात सलग दोनदा ट्रॉफी जिंकणारा आरसीबी हा आता तिसरा संघ बनला आहे. आरसीबीने २०२५ आणि २०२६ चे विजेतेपद पटकावले आहे, तर यापूर्वी चेन्नईने (२०१०, २०११) आणि मुंबईने (२०१९,

(पान ४ वर...☞)

# देशाच्या राजकारणात मोठा भूकंप!

## बडा नेता भाजप सोडचिठ्ठी देत नवा पक्ष स्थापन करणार...

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** तामिळनाडू राजकारणातून एक मोठी बातमी समोर आली आहे. भाजपचे माजी अध्यक्ष के अण्णामलाई यांच्याविषयीच्या चर्चा तीव्र झाल्या आहेत. विधानसभा निवडणुकीत भाजपच्या दारूण पराभवानंतर अण्णा मलाई लवकरच भाजपची साथ सोडून आपला नवीन राजकीय पक्ष स्थापन करू शकतात, अशी चर्चा तामिळनाडूच्या राजकीय वर्तुळात सुरू झाल्या आहेत. या चर्चांमुळे राजकारणात खळबळ उडाली आहे.

**समर्थकांकडून पक्षाचे नाव शेअर करण्यास सुरुवात**

गेल्या काही दिवसांपासून राज्यात सातत्याने दबक्या आवाजात या चर्चा सुरू आहेत. पण लक्षणीय बाब म्हणजे, अण्णामलाई यांच्या समर्थकांनी सोशल मीडियावर पक्षाची संभाव्य नावे आणि ध्वजाचे डिझाइनसुद्धा शेअर करण्यास सुरुवात केली आहे. नवीन पक्षाबाबत एक मोठी घोषणा जूनमध्ये केली जाऊ शकते, असा दावाही काही समर्थकांकडून करण्यात आला आहे.



**'मन की बात' कार्यक्रमाबद्दल पोस्ट नाही**

दरम्यान, अण्णामलाई यांच्या काही अलीकडील वक्तव्यांमुळे ही या अटकळांना बळ मिळाले आहे. त्यांनी इयत्ता नववीपासून त्रि-भाषा धोरण लागू करण्याच्या सीबीएसईच्या निर्णयावर जाहीरपणे टीका केली होती. इतकेच नाही, तर त्यांनी रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाबद्दल कोणतीही पोस्ट केली नाही, त्यामुळे या चर्चांना अधिक बळ मिळू लागले आहे.

**अण्णामलाई युतीमध्ये नाराज**

माध्यमांच्या वृत्तानुसार, २०२६ च्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीसाठी भाजप आणि एआयएडीएमके यांच्यातील पुनर्युतीच्या निर्णयावर अण्णामलाई नाराज होते. नंतर त्यांनी पक्ष नेतृत्वाला पाठिंबा दिला आणि एनडीएसाठी सक्रियपणे प्रचार केला.

माजी आयपीएस अधिकारी असलेले अण्णामलाई, जुलै २०२१ मध्ये वयाच्या ३७ व्या वर्षी तामिळनाडू भाजपमध्ये सामील झाले आणि सर्वात तरुण प्रदेशाध्यक्षांपैकी एक बनले. ते २०२५ पर्यंत भाजपचे प्रदेशाध्यक्ष राहतील. एआयएडीएमकेसोबतची भाजपची युती तुटल्यानंतर, ते पक्षाच्या नेतृत्वावर वारंवार टीका करत होते, ज्यामुळे युतीच्या पुनरागमनावरील त्यांच्या भूमिकेबद्दल चर्चा सुरूझाली.

**भाजपने या अटकळी फेटाळल्या**

भाजपच्या एका वरिष्ठ नेत्याने या अटकळी फेटाळून लावल्या आणि सांगितले की, अण्णामलाई भाजप सोडत असल्याची किंवा नवीन पक्ष स्थापन करण्याची तयारी करत असल्याची कोणतीही माहिती पक्षाकडे नाही. पक्षाच्या सूत्रांनुसार, त्यांना लवकरच संघटनेत राष्ट्रीय स्तरावरील जबाबदारी दिली जाऊ शकते.

# तुम्ही तुमच्याच पायावर दगड मारून घेत आहात

## इराणचा पाकिस्तानला मोठा इशारा थेट...

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** पाकिस्तान गेल्या काही दिवसांपासून भारताला धक्का देण्याकरिता अमेरिकेसोबत संबंध चांगले करत आहे. हेच नाही तर पाकिस्तानचे पंतप्रधान उठ सूट अमेरिकेत जातात. डोनाल्ड ट्रम्प यांनी पाकिस्तानमध्ये मोठा पैसा गुंतवला आहे. मात्र, पाकिस्तानने अमेरिकेसोबत केलेली ही मैत्री त्यांच्यावरच भारी पडणार आहे. इराण आणि अमेरिका युद्धात देखील पाकिस्तान मध्यस्थी करण्याकरिता मैदानात उतरला होता. मात्र, त्यांना मोठे अपयश मिळाले. अमेरिकेने कोणताही विचार न करता पाकिस्तानला लाथ मारून चर्चेतून बाहेर काढले. फक्त भारतावर दबाव वाढवण्याकरिता पाकिस्तानने अमेरिकेचे पाय धरले आहेत. आता अमेरिकेने पाकिस्तानला आपला खरा मित्र म्हटले. अमेरिका आणि पाकिस्तान यांच्यातील वाढलेली मैत्री पाहून मोठा इशारा इराणने पाकिस्तानला दिला.

फिनलॅंडमधील इराणी दूतावासांनी एक सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली. ज्यामध्ये त्यांनी इशारा देत पाकिस्तानला सावध राहण्यास सांगितले. त्यांनी या पोस्टमध्ये लिहिले की, पाकिस्तानला खूप जास्त सावधान राहावे लागेल. सर्वात धोकादायक ती वेळ असते, जेव्हा अमेरिका एखाद्या देशाला आपला जवळचा खरा मित्र म्हणते. इतिहास



सांगतो की, ज्यावेळी अशा मैत्रीचे दावे केले जातात, त्यावेळी त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतात. या शब्दांना लक्षात ठेवा आणि स्वत: बघा.. इराणकडून पाकिस्तानला हा इशारा म्हणावा लागेल. अमेरिकेचे रक्षा मंत्री पीट हेगसेथ यांनी सिंगापुरमधील शांगरी ला डायलॉगमध्ये पाकिस्तानचे मोठे कौतुक केले. यादरम्यानच अमेरिकेने मागणी केली की, पाकिस्तानने इस्त्रायलला मान्यता द्यावी. मात्र, इस्त्रायल आणि पाकिस्तानमध्ये वाद आहेत.

इराणने पाकिस्तानला दाखवून दिले की, इतिहासामध्ये अमेरिकेने यापूर्वी अनेकदा पाकिस्तानला धोका दिला आहे. अमेरिकेच्या रक्षा मंत्र्यांनी फक्त पाकिस्तानच नाही तर भारतालाही आपला जवळचा मित्र म्हटले. आशियात चीनची दादागिरी सहन केली जाणार नसल्याचे त्यांनी म्हटले. गेल्या काही वर्षात पाकिस्तान आणि अमेरिका यांच्यातील संबंध सुधारली आहेत. मात्र, काश्मीरचा मुद्द्यात अमेरिकेने दूर राहण्याचा निर्णय घेतला. ज्याने पाकिस्तानकडून यापूर्वीच नाराजी व्यक्त केली होती.

# कच्च्या पाम तेल आयातीवर ४४ टक्के शुल्क लावण्याची तेलंगणा सरकारची मागणी...

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** तेलंगणा राज्य सरकारने देशांतर्गत खाद्यतेल उत्पादनाला चालना देण्यासाठी कच्च्या पाम तेल अर्थात क्रूड पाम ऑइलवरील आयात शुल्क ४४ टक्के करण्याची मागणी केंद्र सरकारकडे केली आहे. तेलंगणा राज्य देशातील पाम लागवडीत आघाडीवर असून देशाच्या एकूण पाम क्षेत्रापैकी ३६ टक्के वाटा आहे. राज्य सरकारने २०२६-२७ मध्ये आणखी ३४ हजार हेक्टर क्षेत्र पामाखाली आणण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

तेलंगणाचे कृषिमंत्री तुम्मला नागेश्वर राव यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांना पत्र लिहून शुल्कवाढीची मागणी केली आहे. त्यांनी नमूद केले की, २०१८ मध्ये कच्च्या पाम तेलावरील आयात शुल्क ४४ टक्के असताना पाम उत्पादकांना चांगला दर मिळत होता. मात्र सध्या हे शुल्क १६.५० टक्के असून गेल्या वर्षी ते २७.५० टक्के होते.



कृषिमंत्र्यांनी पत्रात असेही म्हटले की, कच्च्या पाम तेलावरील मूलभूत सीमाशुल्क कमी केल्यामुळे देशांतर्गत कच्च्या पाम तेलाच्या किमतींवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. परिणामी पामाच्या दरात घट झाली असून शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर त्याचा परिणाम झाला आहे. त्यामुळे राष्ट्रीय खाद्यतेल अभियान पाम (एनएमईओ-ओपी) योजनेची अंमलबजावणी सुरू असताना देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी आयात शुल्क पुन्हा ४४ टक्के करण्याचा विचार करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. वाढत्या खाद्यतेलाच्या मागणीच्या पार्श्वभूमीवर पाम लागवडीला धोरणात्मक महत्त्व प्राप्त झाले असल्याचे कृषिमंत्र्यांनी म्हटले आहे. इतर तेलबिया पिकांच्या तुलनेत तेलपामातून अधिक उत्पादन आणि चांगला आर्थिक परतावा मिळतो. एकदा लागवड केल्यानंतर सुमारे ३० वर्षांपर्यंत उत्पादन मिळते. सरासरी एका एकरातून दोन ते तीन लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. सध्या ताज्या फळघडाचा दर प्रतिटन २३ हजार ५०० रुपये आहे, याकडे कृषिमंत्री राव यांनी लक्ष वेधले.

देशात खाद्यतेलाच्या गरजेपैकी मोठा हिस्सा आयातीत पाम तेलातून पूर्ण केला जातो. त्यामुळे कच्च्या पाम तेलावरील आयात शुल्क कमी झाल्यास स्वस्त आयात वाढते आणि त्याचा परिणाम देशांतर्गत खाद्यतेल तसेच तेलबिया बाजारावर होतो. याउलट आयात शुल्क वाढल्यास आयातीत पाम तेल महाग होण्याची शक्यता असते. त्यामुळे देशांतर्गत तेलबिया आणि खाद्यतेलाला तुलनेने चांगला आधार मिळू शकतो.

# सर्वोच्च न्यायालयाला मिळाले ५ नवे न्यायाधीश; ही आहेत नावे...

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** सर्वोच्च न्यायालयाला पाच नवीन न्यायाधीश मिळालेत. सोमवारी (१ जून) केंद्र सरकारने ४ राज्यांच्या उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायाधीश तसेच सर्वोच्च न्यायालयातील एका ज्येष्ठ महिला वकिलांची देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यास मंजुरी दिली आहे. केंद्रीय कायदा व न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी स्वतः ही माहिती दिली. यापूर्वी एका अध्यादेशाद्वारे सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या नुकतीच ३४ वरून ३८ पर्यंत वाढवण्यात आली होती. या ५ न्यायाधीशांच्या नियुक्तीनंतर सर्वोच्च न्यायालयाची सध्याची न्यायाधीश संख्या आता ३७ झाली आहे.

ज्येष्ठ वकील व्ही. मोहना यांनी आता इतिहास घडवला : तत्पूर्वी मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने या नावांबाबतच्या शिफारसी केंद्र सरकारकडे पाठवल्या होत्या. सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाल्यामुळे ज्येष्ठ वकील व्ही. मोहना यांनी आता इतिहास घडवला आहे. व्ही. मोहना यांच्याशिवाय पंजाब आणि



हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश शील नागू, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर, मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश संजीव सचदेवा आणि जम्मू आणि काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश अरुण पल्ली यांच्या नियुक्त्यांनाही मंजुरी मिळाली आहे. या नियुक्त्यांकडे फक्त रिक्त पदे भरण्याची एक प्रक्रिया म्हणून पाहिले जात नाही. या न्यायिक नियुक्त्या करताना ज्येष्ठता, गुणवत्ता, प्रादेशिक प्रतिनिधित्व आणि विविधता यांसारख्या बाबींचाही विचार करण्यात आला आहे. या नियुक्त्यांची प्रक्रिया काही दिवसांपूर्वी म्हणजेच २७ मे रोजी सुरू झाली. जेव्हा सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने या ५ व्यक्तींना सर्वोच्च न्यायालयात बढती देण्याची (न्यायाधीश म्हणून नियुक्त करण्याची) शिफारस केली होती. ही शिफारस सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वात कॉलेजियमने जारी केलेली नियुक्त्यांची पहिली मोठी यादी मानली जाते. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी नोव्हेंबर २०२५ मध्ये देशाचे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारला होता.

# भारत-नेपाळ सीमावादाच्या विषयात हस्तक्षेप करण्याबाबत ब्रिटनकडून भूमिका स्पष्ट

## बालेन शाह यांना दुसरा धक्का...

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** भारताशी सीमा वादाच्या विषयात नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांना मोठा झटका बसला आहे. सुगौली कराराचा हवाला देत नेपाळच्या पंतप्रधानांनी ब्रिटनकडे मदत मागितली होती. पण ब्रिटनने बालेन शाह यांची विनंती धुडकावून लावली आहे.

भारत-नेपाळमधला हा द्विपक्षीय विषय आहे. यात आम्ही हस्तक्षेप करणार नाही असं ब्रिटनने स्पष्ट केलं आहे. भारताशी सीमा वादाच्या विषयावरुन नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांची आपल्याच देशात कोंडी झाली आहे, त्यानंतर त्यांना आता ब्रिटनच्या रुपाने दुसरा धक्का बसला आहे. द काठमांडू पोस्टच्या वृत्तानुसार बालेन शाह यांचे मुख्य सल्लागार कुमार ब्यांजंकर यांनी काही दिवसांपूर्वी राजधानी काठमांडूमध्ये ब्रिटिश राजदूत रॉब फेन यांची भेट घेतली होती. 'नेपाळ आणि भारतामध्ये बॉर्डर संदर्भात सुगौली करार आहे. त्यात ब्रिटनही एक पक्षकार आहे. अशावेळी सीमावाद सोडवण्यासाठी ब्रिटनने पुढाकार घेतला पाहिजे' असं ब्यांजंकर यांचं म्हणणं आहे.



१८१६ साली ईस्ट इंडिया कंपनी आणि नेपाळमध्ये सुगौली करार झाला होता. दोन्ही देशांमध्ये बॉर्डरच्या सर्वेक्षणासंदर्भात निर्णय झाला होता. नेपाळ हा करार मान्य करायला तयार नाही. त्यांचं म्हणणं आहे की, या करारात काठमांडूची काही जमीन भारताला देण्यात आली आहे. कालापानी याचं मुख्य उदहारण आहे, असं नेपाळचं म्हणणं आहे. बालेन शाहयांचे मुख्य सल्लागार ब्यांजंकर यांनी ब्रिटनच्या पंतप्रधानांना सांगितलं की, तुम्ही त्यावेळी एक पक्षकार होता, त्यामुळे तुम्ही या विषयावर बोललं पाहिजे. तुम्ही पुढाकार घेतला, तर नेपाळ आणि भारतामध्ये करार होऊ शकतो असं रिपोर्टमध्ये म्हटलं आहे.

**बालेन शाह माफी मागणार का?**

यावर ब्रिटनच्यावतीने भूमिका स्पष्ट करताना फेन म्हणाले की, भारत आणि नेपाळमधाल द्विपक्षीय विषय आहे. ब्रिटन यात हस्तक्षेप करणार नाही. त्यानंतर बालेन शाह यांचे सल्लागार ब्यांजंकर माघारी फिरले. रविवारी ३१ मे रोजी नेपाळी संसदेत बोलताना बालेन शाह यांनी सीमा वादासंदर्भात वादग्रस्त वक्तव्य केलं. बालेन म्हणाले की, 'पंतप्रधान झाल्यावर मला कळलं की, नेपाळने सुद्धा भारताच्या काही भूभागावर कब्जा केला आहे' त्यांच्या या वक्तव्याला विरोधी कम्युनिस्ट पार्टीने राष्ट्रद्रोह ठरवलं आहे. नेपाळच्या परराष्ट्र मंत्रालयाने एक स्टेटमेंट जारी करुन हे वक्तव्य चुकीचं असल्याचं म्हटलं आहे. नेपाळच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या मते नेपाळचे काही शेतकरी भारतात शेती करतात. बालेन शाह यांनी या वक्तव्यासाठी माफी मागितली पाहिजे अशी नेपाळमधल्या विरोधी पक्षांची मागणी आहे.









# काँग्रेस पक्षातर्फे रामदास पाटील सुमठाणकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
देगलूर - प्रतिनिधी
संतोष मंनधरणे





**देगलूर :** काँग्रेस पक्षाचे उमेदवार रामदास पाटील सुमठाणकर यांनी नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघासाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी काँग्रेस पक्षाचे खासदार रवींद्र पाटील चव्हाण यांच्या नेतृत्वात उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर सुमठाणकर यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. तसेच मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी रामदास पाटील सुमठाणकर यांच्या उमेदवारीमुळे पक्ष अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त केला. अर्ज दाखल प्रक्रियेदरम्यान समर्थकांनी घोषणाबाजी करत उत्साहाचे वातावरण निर्माण केले. नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे उमेदवारी अर्ज दाखल करते वेळेस खा रवींद्र चव्हाण आ हणमंत पाटील बेटमोगरेकर, आ माधवराव पाटील जवळगांवकर, माजी महापौर अब्दुल सत्तार भाई, एकनाथ दादा मोरे, जिल्हाध्यक्ष विठ्ठलभाऊ पावडे, महानगर अध्यक्ष अब्दुलभाई गफार, जिल्हाध्यक्ष राजेश भाऊ पावडे, माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरसेटवार, नगरसेवक बालाजी रोयलावार, अविनाश नीलमवार पक्षाचे सर्व पदाधिकारी,जेष्ठ नेते आणि नगरसेवक -नगरध्यक्ष तसेच रामदास पाटील सुमठाणकर समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित...

# ट्रक चालकाचे नियंत्रण सुटले

## मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर भीषण अपघात, दोघांचा मृत्यू, तिघे जखमी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**पुणे :** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मुंबई वाहिनीवर सोमवारी (दि.१ जून) पहाटे साडेचारच्या सुमारास भीषण अपघात घडला. तांदूळ भरलेला ट्रक, खाद्य तेल वाहून नेणारा कंटेनर आणि एर्टिगा कार यांचा समावेश असलेल्या या अपघातात ट्रक चालक व क्लिनर यांचा जागीच मृत्यू झाला असून इतर तिघेजण जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पुण्याकडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या तांदूळ भरलेल्या ट्रकवरील चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने समोर असलेल्या कंटेनर ट्रकला पाठीमागून जोरदार धडक बसली. याचवेळी बाजूने जाणाऱ्या कारलाही धडक लागल्याने अपघाताची तीव्रता वाढली. धडकेनंतर तांदूळ भरलेला ट्रक आणि खाद्य तेल वाहून नेणारा कंटेनर रस्त्यावर पलटी झाला.

या अपघातात ट्रक चालक व क्लिनर यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांची ओळख अद्याप पटलेली नाही. कंटेनर चालक किरकोळ जखमी झाला असून एर्टिगा कारमधील एका प्रवाशाला गंभीर तर अन्य एकाला किरकोळ दुखापत झाली आहे. जखमींमध्ये लिलाबाई सस्ते (वय ८०), मुकिंदा सस्ते (वय ५६) आणि महेंद्र पाल (वय ३९) यांचा समावेश आहे. अपघातामुळे तांदळाच्या बॅगा आणि खाद्य तेल रस्त्यावर विखुरल्याने काही काळ द्रुतगती मार्गावरील चारही लेन प्रभावित झाल्या होत्या. जखमींना उपचारासाठी खोपोली ग्रामीण रुग्णालय तसेच एमजीएम रुग्णालय, कामोठे येथे हलविण्यात आले.

अपघातग्रस्त वाहने आणि रस्त्यावर पडलेला माल हटवून वाहतूक सुरळीत करण्यात आली. या मदतकार्यात महामार्ग वाहतूक पोलीस यंत्रणा बोरघाट, खोपोली पोलीस स्टेशन, आय आर बी पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणा, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बल, लोकमान्य हॉस्पिटल आणि हेल्प फाउंडेशन अशा विविध यंत्रणानी सहभाग घेतला.

# व्यसनमुक्तीची वारी आली आपल्या दारी

## अण्णा हजारे यांच्या हस्ते अभियानाचा शुभारंभ

- शिरूर पोलीस स्टेशन व राजश्री शाहू प्रतिष्ठानचा संयुक्त उपक्रम
- १६ गावांत जनजागृती, व्यसनमुक्त महाराष्ट्राचा निर्धार

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वाघोली - प्रतिनिधी
स्वरुप गिरमकर




**(पुणे) वाघोली :** समाजाला व्यसनमुक्त, तणामुक्त आणि निरोगी जीवनशैलीकडे नेण्यासाठी शिरूर पोलीस स्टेशन व राजश्री शाहू प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने 'व्यसनमुक्त व तणामुक्त महाराष्ट्र अभियान' अंतर्गत 'व्यसनमुक्तीची वारी आली आपल्या दारी' या विशेष जनजागृती कार्यक्रमाचा शुभारंभ आज ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला.

व्यसनमुक्तीचा संदेश घराघरापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली ही जनजागृती वारी शिरूर शहर, शिरूर ग्रामीण, अण्णापूर, मलठण, कवठे, टाकळी हाजी, आमदाबाद, तरडोबाची वाडी, गोलेगाव, निमोणे, गुनाट, मांडवगण फराटा, वडगाव रासाई, न्हावरे, करडे आदी गावांमधून मार्गक्रमण करणार आहे.

या अभियानादरम्यान व्यसनमुक्तीबाबत जनजागृती, प्रतिज्ञा वाचन, मान्यवरांचे मार्गदर्शन, डायल ११२ आपत्कालीन सेवेची माहिती, दामिनी पथकाच्या कार्याची ओळख, महिलांच्या सुरक्षेबाबत मार्गदर्शन तसेच सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी विशेष मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय व्यसनमुक्ती संदर्भातील समुपदेशन आणि प्रबोधनपर कार्यक्रमांद्वारे नागरिकांमध्ये सकारात्मक विचार रुजविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

या कार्यक्रमात पोलीस अधिकारी, अंमलदार, सामाजिक कार्यकर्ते, युवक, महिला, विविध संस्थांचे प्रतिनिधी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. समाजातील वाढत्या व्यसनाधीनतेला आळा घालण्यासाठी आणि तरुण पिढीला योग्य दिशा देण्यासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

**'व्यसनमुक्त समाज ही काळाची गरज आहे. विशेषतः युवकांमध्ये वाढत असलेल्या व्यसनाधीनतेमुळे अनेक कुटुंबांचे नुकसान होत आहे. त्यामुळे केवळ कायद्याची अंमलबजावणी करून हा प्रश्न सुटणार नाही, तर जनजागृती आणि समाजाचा सक्रिय सहभागही तितकाच महत्त्वाचा आहे. 'व्यसनमुक्तीची वारी आली आपल्या दारी' या अभियानाच्या माध्यमातून गावागावांत जाऊन नागरिकांमध्ये सकारात्मक विचार रुजविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. प्रत्येक नागरिकाने व्यसनमुक्त महाराष्ट्र घडविण्यासाठी पुढाकार घ्यावा**

**- संदेश केंजळे, पोलीस निरीक्षक, शिरूर पोलीस स्टेशन**

# प्रस्तावित देवस्थान इनाम निर्मूलन कायदा तात्काळ मागे घ्या

## चिपळूण तालुक्यातील मंदिरांची शासनाकडे मागणी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
चिपळूण- प्रतिनिधी
स्वाती हडकर



**चिपळूण :** महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेल्या 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम २०२६' या कायद्याला चिपळूण तालुक्यातील विविध मंदिरांनी तीव्र विरोध दर्शविला असून, हा कायदा तात्काळ मागे घ्यावा, अशी मागणी महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भातील निवेदन महाराष्ट्राचे राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि महसूल मंत्री यांच्या नावे तहसीलदार प्रवीण लोकरे यांना सादर करण्यात आले. महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रस्तावित कायदा हा केवळ जमीन विषयक प्रशासकीय प्रश्न नसून हिंदू देवस्थानांचे अस्तित्व, धार्मिक स्वातंत्र्य, मंदिरांची आर्थिक स्वायत्तता, परंपरा, श्रद्धा तसेच भारतीय राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांशी निगडित अत्यंत गंभीर विषय आहे. या कायद्यामुळे देवस्थानांच्या मालमत्ता हक्कांवर थेट परिणाम होण्याची शक्यता असल्याने तो मागे घेणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदन सादर करताना सावर्डे येथील श्री केदारनाथ देवस्थानचे अध्यक्ष यशवंत चव्हाण, प्रदीप चव्हाण, रमेश चव्हाण, कोकरे देवस्थानचे संभाजी दळवी, विनायक दळवी, महेश दळवी, मांडकी देवस्थानचे अध्यक्ष संदीप खांबे, सचिव सुभाष डोंगरे, कोळकेवाडी देवस्थानचे प्रकाश शिंदे, कळमुंडी देवस्थानचे नंदकुमार थरवळ, कौंढरताम्हाणे देवस्थानचे यशवंत खांडेकर, चिवेली देवस्थानचे नंदकिशोर शिर्के, सनातन संस्थेचे केशव अष्टेकर, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे जिल्हा संघटक सुरेश शिंदे तसेच जयवंतराव शिंदे यांच्यासह विविध देवस्थानांचे विश्वस्त व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी देवस्थानांच्या पारंपरिक हक्कांचे संरक्षण करण्यासाठी शासनाने प्रस्तावित कायद्याचा पुनर्विचार करून तो तात्काळ मागे घ्यावा, अशी एकमुखी मागणी केली.

# नवीन राजकीय पक्ष काढणार?

## मनोज जरांगेचं मोठं विधान; काय दिलं उत्तर...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**मुंबई :** मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटीमध्ये मराठा समाजाच्या मागण्यांसाठी उपोषण सुरूकेले होते, मात्र सरकारने मागण्या मान्य केल्यानंतर त्यांनी उपोषण सोडण्याचा निर्णय घेतला होता. अशातच आज पत्रकाराशी बोलताना त्यांनी मराठा आरक्षणासह वेगवेगळ्या मुद्द्यांवर भाष्य केले आहे. जरांगे पाटलांना नवीन राजकीय पक्ष काढण्यावरही प्रश्न विचारण्यात आला होता, यावरही जरांगे पाटलांनी उत्तर दिले आहे. त्यांनी नेमकं काय म्हटलं ते सविस्तर जाणून घेऊयात.

**मी इमानदारीने लढाई लढत आहे - जरांगे पाटील**

मराठा आरक्षणाच्या प्रमाणपत्र वाटपाबाबतच्या अधिसूचनेबाबत विचारले असता जरांगे पाटलांनी म्हटले की, 'मंगळवार पासून आदेश काढण्याचे काम सुरूहोणार आहे. आता काम थांबणार नाही. कुणाचाही दबाव आला तरी आता काम थांबणार नाही. सरकार आता मराठा समाजावर अन्याय होईल असे पाऊल उचलणार नाही.' जीआर न घेता उपोषण का सोडले यावर बोलताना जरांगे पाटलांनी म्हटले की, 'सामान्य जनतेला माहिती आहे. मी इमानदारीने लढाई लढत आहे. मी कधीही हटलेलो नाही. कोर्टात जीआर जाणार नाही असे काही करायचे नाही असे विखे पाटील यांनी सांगितिले आहे. एका महिन्यात जीआर दिसेल.'

**विधानपरिषदेच्या उमेदवारीवर भाष्य**

सध्याच्या विधान परिषद निवडणुकीसाठी अनेक आयात उमेदवारांना संधी देण्यात आली आहे. यावर बोलताना जरांगे पाटलांनी सांगितले की, काल एका पक्षात होते, आज दुसऱ्या पक्षात आहेत. आता नेत्यांची पोरं उमेदवार आहेत, कार्यकर्त्यांनी काय करावं? लोकांनी शहाणं व्हावं. ते जनतेचा विचारच करत नाहीच. प्रत्येक पक्षाने फक्त पक्षातील कार्यकर्त्यांना डावलले आहे.

**जरांगे पाटील राजकीय पक्ष काढणार?**

मनोज जरांगे पाटील यांना राजकीय पक्ष काढण्याबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. यावर बोलताना त्यांनी म्हटले की, 'पक्ष नको, नळी-गाड्या काय काय करावं लागतं म्हणून नको. एखाद्याने पक्ष काढला पाहिजे म्हणजे सर्व चांगलं होईल असं नाही. त्या मुलाने कॉक्रोज पार्टी काढली पण त्यालाही धमकी येत आहे. एखाद्या खमक्या नेत्याने नवीन पक्ष काढला पाहिजे.

# उजनीने धरणाने गाठला तळ; शेतीसाठीचे पाणी बंद,

## चार लाख शेतकऱ्यांचा जीव टांगणीला...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा




**मुंबई :** उन्हाळा अखेरीला येईल तसा उजनी धरणाचीपाणी पातळी तळ गाठायला सुरुवात झाली असून, सध्या वजा १७.७ टक्क्यांपर्यंत खालावली आहे. पुढील दोन महिने चिंतेचे असून, पुणे जिल्ह्यात पडणाऱ्या पावसावर सोलापूर जिल्ह्याचे भवितव्य अवलंबून असणार आहे. उजनी धरणात ५४.४६ टीएमसी पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. गतवर्षी पडलेल्या मान्सूनपूर्व पावसाने उजनी धरणाची पाणी पातळी वाढण्यास सुरुवात झाली होती. यावर्षी हवामान खात्याने अल्प प्रमाणात व ठराविक अंतराने पाऊस पडणार असल्यामुळे सोलापूर जिल्ह्याचे भवितव्य पुणे जिल्ह्यातील भीमा खोऱ्यात पडणाऱ्या मान्सूनच्या पावसावर अवलंबून असणार आहे.

गतवर्षीपेक्षा यंदा उजनीचा पाणीसाठा आणखी खालावणार असल्यामुळे उन्हाळ्यात जपलेली पिके ऐन पावसाळ्याचा तोंडावर करपण्याची भीती व्यक्त केली जात आहे. उजनीतून सोडण्यात येणारे शेतीसाठीचे पाणी सध्या बंद केले आहे.

उजनी मृत साठ्यात जाताच सीना-माढा व दहीगाव योजना बंद केली, तर २५ मे रोजी उजनी मुख्य कालवा व बोगदा बंद करण्यात येणार आहे, तर उजनीतून भीमा नदीत आषाढी वारीसाठी पाणी सोडण्याची शक्यता आहे.

सोलापूर जिल्ह्याची जीवनवाहिनी असलेल्या उजनी धरणातील पाणीपातळी यंदाही उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे कमालीची घटली आहे. दरम्यान, गेल्या वर्षीच्या याच काळातील वजा २१.४३ टक्के या पाणीसाठ्याच्या तुलनेत यंदा धरणाची स्थिती साधारण ४ टक्क्यांनी बरी असल्याचे समोर आले आहे.

**चार लाख शेतकऱ्यांचा जीव टांगणीला**

उजनी धरणावर ४ लाख शेतकरी अवलंबून असून, २००३ मध्ये उजनी सर्वाधिक वजा ६५ टक्क्यांपर्यंत खालावली होती.

२०१६ मध्ये ५३.३९ टक्के, तर २०२३ मध्ये कमी पावसामुळं उजनीत फक्त ६६ टक्के भरले होते. त्यामुळे १८ जानेवारी २४ रोजी मृत साठ्यात गेले होते.

सध्या २०२३ सारखी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता भीती व्यक्त होत असून, ऑगस्टअखेरपर्यंत पाणी जपून वापरण्याचा सूचना शासनाने केल्या आहेत. सोलापूर, पुणे व अहिल्यानगर जिल्ह्यातील ४ लाख शेतकऱ्यांचा जीव टांगणीला लागला आहे.

# वर्षभराच्या संघर्षाला अखेर यश

## गणेशपूर-थोरावा रस्ता दुरुस्तीचा मार्ग मोकळा

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वसमत - प्रतिनिधी
बालाजी अडकीने




**वसमत :** गणेशपूर, थोरावा, कागबन आणि सारोळा गावांना जोडणाऱ्या मुख्य रस्त्याच्या दुरुस्तीसाठी सुरूअसलेल्या आमरण उपोषणाला अखेर यश आले आहे. वर्षभरापासून या रस्त्याच्या प्रश्नासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे पत्रकार प्रशांत लोखंडे थोरावेकर यांनी १ जून रोजी वसमत उपविभागीय कार्यालयासमोर सुरू केलेले लक्षवेधी उपोषण प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले. संततधार पावसातही आपल्या मागणीवर ठाम राहून प्रशांत लोखंडे यांनी आंदोलन सुरू ठेवले. त्यांच्या निर्धाराची दखल घेत उपविभागीय अधिकारी माने साहेब व बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता राणा कुलकर्णी यांनी आंदोलनस्थळी भेट देत चर्चा केली.यावेळी प्रशासनाकडून 'पुढील एका महिन्याच्या आत रस्ता दुरुस्तीची आवश्यक कार्यवाही पूर्ण करण्यात येईल' असे लेखी आश्वासन देण्यात आले. त्यानंतर उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले. यावेळी प्रशासनाकडून 'पुढील एका महिन्याच्या आत रस्ता दुरुस्तीची आवश्यक कार्यवाही पूर्ण करण्यात येईल' असे लेखी आश्वासन देण्यात आले. त्यानंतर उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले. यावेळी प्रशासनाकडून 'पुढील एका महिन्याच्या आत रस्ता दुरुस्तीची आवश्यक कार्यवाही पूर्ण करण्यात येईल' असे लेखी आश्वासन देण्यात आले. त्यानंतर उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले. शासकीय स्त्री रुग्णालय ते गणेशपूर-थोरावा-कागबन-सारोळा या मार्गावरील रस्ता खड्ड्यांनी भरलेला असून नागरिक, रुग्ण आणि विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही प्रतिसाद न मिळाल्याने अखेर उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागला. प्रशासनाने दिलेले आश्वासन प्रत्यक्षात उतरले नाही तर लढा अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा प्रशांत लोखंडे यांनी दिला आहे. ग्रामीण भागातील नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले असून आता प्रशासनाच्या आश्वासनाची पूर्तता कधी होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. 'काम सुरू झाले नाही तर पुन्हा आंदोलन'

# चुटकुले

मागच्याच आठवड्यात नर्सने मला ✲वय ४५ वर्षावरील वाटत नाही✲ या कारणाने लस दिली नाही..... हे माझ्या बायकोने जरा जास्तच मनावर घेतलं.

मग बायकोने घरी येऊन ✲संतूर✲ तर लपवलाच पण सोबत ✲हेयरडाय, रेझर✲ वगैरे सगळंच लपवलं.

मग आज ती मला पूर्ण तयारीने घेऊन गेली.

नर्स लस टोचतांना म्हणाली....

✲बाबा, लवकर यायचं नां हो.... तुमच्या बरोबरच्या लोकांचे दोन दोन डोस झाले सुद्धा....बरं झालं...., तुमच्या सुनबाई चांगल्या आहेत म्हणून आत्ता का होईना तुम्हाला डोस द्यायला घेऊन आल्या...✲

✲आता कुठे तिचा जीव शांत झाला.

# रिसोड हादरले! दूरदर्शन भूखंड प्रकरणात मोठ्या आर्थिक व्यवहाराची चर्चा; प्रशासन मौन का?

**‘शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठाला हात न लावणाऱ्या स्वराज्यात आज भूखंडांची खुलेआम विक्री! कृषी उत्पन्न बाजार समितीवर गंभीर आरोप’**

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
रिसोड - प्रतिनिधी
विजय जुंजारे




**रिसोड :** रिसोड शहरातील कथित दूरदर्शन भूखंड प्रकरण पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले असून या प्रकरणामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित भूखंडाच्या लिलाव प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार झाल्याची चर्चा शहरभर रंगत असून या संपूर्ण व्यवहाराची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी दिवसेंदिवस जोर धरत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित भूखंडाच्या मालकी हक्काबाबत, त्याच्या वापरावरील अधिकाराबाबत तसेच लिलावासाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय आणि कायदेशीर प्रक्रियांबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. नगर परिषदेच्या ताब्यात असल्याचे सांगितल्या जाणाऱ्या जागेचा लिलाव नेमका कोणत्या अधिकारातून करण्यात आला, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती जनतेसमोर आलेली नाही. त्यामुळे या व्यवहाराची पारदर्शकता संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, सार्वजनिक मालमत्तेच्या व्यवहारात सर्व नियमांचे काटेकोर पालन होणे आवश्यक असताना या प्रकरणात अनेक महत्त्वाच्या बाबींकडे दुर्लक्ष करण्यात आल्याची शक्यता नाकारता येत नाही. लिलावाची जाहिरात, त्याची प्रक्रिया, पात्रता अटी, मंजुरी, तसेच संबंधित विभागांची परवानगी याबाबतची संपूर्ण माहिती सार्वजनिक करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, नागरिकांमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा संदर्भ दिला जात आहे की, ‘शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठाला सुद्धा हात लागता कामा नये’ असे स्वराज्य स्थापनेवेळी सांगितले गेले होते. परंतु आज परिस्थिती उलटी असल्याची भावना व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्य करायला हवे असलेल्या संस्थांकडूनच त्यांच्या हक्कांवर गदा येत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीवर भूखंड व्यापाऱ्यांना विकण्याचे आरोप होत असून शेतकऱ्यांसाठी विकासकामांसाठी राखीव भूखंड उपलब्ध नसल्याचीही चर्चा आहे. कुठे रयतेचे राजे आणि कुठे आजची परिस्थिती असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. तसेच जनतेच्या पैशातून उभारलेल्या व्यवस्थेत काहीजण वैयक्तिक लाभ, महागड्या गाड्या आणि आलिशान जीवनशैलीत गुंतल्याचा आरोपही चर्चेत आहे. मात्र हे सर्व आरोप असून याबाबत अधिकृत चौकशी होणे आवश्यक असल्याचेही जाणकार सांगत आहेत.

या प्रकरणात कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मंडळ, संबंधित अधिकारी, सचिव तसेच इतर संबंधित यंत्रणांच्या भूमिकेबाबतही विविध स्तरावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. नागरिकांमध्ये अशी चर्चा आहे की, या व्यवहारामध्ये संगनमताने निर्णय घेण्यात आले का, याची चौकशी होणे आवश्यक आहे. तसेच व्यवहारामागे आर्थिक हितसंबंध होते का, याचाही तपास झाला पाहिजे, अशी मागणी होत आहे. विशेष म्हणजे, या संदर्भात विविध स्तरांवर तक्रारी करण्यात आल्याची चर्चा असतानाही अद्याप कोणतीही ठोस प्रशासकीय कारवाई झालेली दिसून येत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. अनेकांच्या मते, जर सार्वजनिक हिताशी संबंधित अशा गंभीर प्रकरणांमध्ये वेळेत चौकशी झाली नाही, तर शासन आणि प्रशासनावरील जनतेचा विश्वास डळमळीत होण्याची शक्यता आहे.

शेतकऱ्यांच्या आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी स्थापन झालेल्या संस्थांकडूनच जर सार्वजनिक मालमत्तेबाबत वादग्रस्त निर्णय घेतले जात असतील, तर ही अत्यंत चिंतेची बाब असल्याचे मत अनेक नागरिक व्यक्त करत आहेत. सार्वजनिक मालमत्ता ही जनतेची संपत्ती असून तिच्या व्यवहारामध्ये पूर्ण पारदर्शकता आणि कायदेशीरता असणे आवश्यक आहे, असेही मत व्यक्त केले जात आहे.

जागरूक नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांनी या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र, निष्पक्ष आणि उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे. संबंधित व्यवहारामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता, नियमभंग, पदाचा गैरवापर अथवा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधितांवर कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पुढे येत आहे. तसेच येत्या ३० दिवसांच्या आत या संपूर्ण भूखंड व्यवहाराची वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, संबंधित सर्व कागदपत्रे सार्वजनिक करावीत आणि चौकशीअंती अनियमितता आढळल्यास संबंधित व्यवहार रद्द करण्यासह दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी विविध सामाजिक संघटना आणि नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, या प्रकरणातील सर्व आरोप आणि चर्चांची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक असून संबंधित अधिकारी, संस्था आणि जबाबदार घटकांची बाजू समोर येणेही तितकेच महत्त्वाचे आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत कोणालाही दोषी ठरविणे योग्य नसले तरी जनतेच्या मनात निर्माण झालेल्या शंकांचे निरसन करण्यासाठी प्रशासनाने तत्काळ भूमिका स्पष्ट करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# धान खरेदी केंद्रासाठी शेतकऱ्यांचा रस्ता रोको

**प्रशासनाच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित**

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
गडचिरोली - प्रतिनिधी
डॉ.जगदीश रा. वेन्नम



**गडचिरोली/सिरोंचा :** नारायणपूर येथे धान खरेदी केंद्र तात्काळ सुरू करण्याच्या मागणीसाठी शेकडो शेतकऱ्यांनी सोमवारी चक्का जाम आंदोलन छेडत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. २५ मे रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊनही कोणतीही कार्यवाही न झाल्याने शेतकऱ्यांनी महामार्ग रोखून आंदोलन केले. धान विक्री न झाल्यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांनी नारायणपूर येथे शासकीय धान खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी लावून धरली. आंदोलनामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. आंदोलनाची माहिती मिळताच महसूल व पोलीस प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. यावेळी तहसीलदार, सिरोंचा यांनी आंदोलक शेतकऱ्यांशी चर्चा करून तीन दिवसांत धान खरेदी केंद्र सुरू करण्याबाबत सकारात्मक आश्वासन दिले. प्रशासनाकडून मिळालेल्या या आश्वासनानंतर शेतकऱ्यांनी आंदोलन स्थगित केले. धान खरेदी केंद्र लवकरात लवकर सुरूकरून शेतकऱ्यांच्या अडचणी दूर कराव्यात, अशी अपेक्षा आंदोलकांनी व्यक्त केली आहे. प्रशासनाच्या आश्वासनाची अंमलबजावणी होते की नाही, याकडे आता परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# बियाणाची पावती जपून ठेवा; फसगत झाली तर दाद मागता येईल !

**देगलूर तालुका कृषी विभागाचा शेतकऱ्यांना सल्ला**

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
देगलूर - प्रतिनिधी
संतोष मंनधरणे




**देगलूर :** पावसाला सुरुवात झाली की खरीप पेरणीसाठी शेतकऱ्यांची धांदल उडते. घाई-गडबडीने बियाणे घेताना काळजी घेतली तर पेरणीनंतर अडचणी येत नाहीत. फसवणूक टाळण्यासाठी देगलूर कृषी खात्याकडून दिलेल्या सूचनांचे पालन करावे. बियाणे खरेदी केल्यानंतर पावती, बियाणांची पिवशी जपून ठेवा, दाद मागता येईल, असा सल्ला तालुका कृषी विभागाने शेतकऱ्यांना दिला. पेरणी होणाऱ्या क्षेत्राची व्यवस्थित उगवण होण्यासाठी तालुका कृषी कार्यालयाची यंत्रणा कार्यरत झाली आहे. सध्या खरीप पूर्व मशागतीला वेग आला आहे. पाऊस पडताच शेतकऱ्यांची पेरणीची धांदल उडणार आहे. शेतकऱ्यांनी आपला विश्वास असलेल्या दोन ठिकाणी खरीप पेरणीसाठी बियाणे खरेदी करण्याचे आवाहन एम.जी. सोनकांबळे यांनी केले आहे.

**बियाणांची उगवण क्षमता तपासून शेतकऱ्यांनी पेरणी करावी. बियाणांची पिशवी जपून ठेवावी जेणेकरून पेरणीनंतर काही प्रश्न उद्भवल्यास अडचण येणार नाही. खते, बियाणे व कीटकनाशके याबाबत काही तक्रार असल्यास ती तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे करावी. तक्रारीसाठी खत विक्रेत्यांकडे क्यूआर कोड देण्यात आला आहे...**

**एम.जी. सोनकांबळे, कृषी अधिकारी (गुण नियंत्रक), तालुका देगलूर**

# संगमवाडीच्या पाच युवकांची भारतीय सैन्यात निवड

## गावकऱ्यांकडून जंगी सत्कार

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
कंधार - प्रतिनिधी
माधव गोटमवाड



**कंधार :** ग्रामीण भागातील युवकांमध्ये जिद्द, चिकाटी आणि देशसेवेची भावना असेल तर कोणतेही ध्येय अशक्य नसते, याचे उत्तम उदाहरण संगमवाडी गावातील पाच युवकांनी दाखवून दिले आहे. पवन परमेश्वर घुगे, लखन परमेश्वर घुगे, ऋषिकेश मारुती घुगे, कृष्णा बाबुराव घुगे आणि शिवदास मारुती तिडके या पाच युवकांची भारतीय सैन्यात (इंडियन आर्मी) निवड झाल्याने संपूर्ण गावात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या यशस्वी युवकांच्या गौरवार्थ गावात सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी युवकांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. भारतीय सैन्यात सेवा करण्याची संधी मिळणे ही अत्यंत अभिमानाची बाब असून या युवकांनी केवळ आपल्या कुटुंबाचेच नव्हे तर संपूर्ण संगमवाडी गावाचे नाव उंचावल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

संगमवाडी हे गाव शिक्षण, क्रीडा तसेच विविध शासकीय सेवांमध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमुळे परिसरात विशेष ओळख निर्माण करत आहे. या गावातील अनेक युवक पोलीस दल, वनविभाग, भारतीय सैन्य तसेच इतर शासकीय विभागांमध्ये यशस्वीपणे सेवा बजावत आहेत. त्यामुळे गावात देशसेवा आणि समाजसेवेची प्रेरणादायी परंपरा निर्माण झाली आहे. या सत्कार समारंभाला सरपंच चक्रधर घुगे, माजी सरपंच नामदेव केंद्रे, माजी पंचायत समिती सदस्य उत्तम चव्हाण, माजी सरपंच दगडोबा घुगे, माजी सरपंच माधवराव घुगे, सीआरपीएफचे पोलीस उपनिरीक्षक गोविंद केंद्रे, मेजर कृष्णा केंद्रे, मेजर आदिनाथ घुगे, गजानन चव्हाण, भानुदास घुगे, आरोग्य सेवक रामचंद्र घुगे, परमेश्वर घुगे, मारोती घुगे, प्रभाकर केंद्रे यांच्यासह गावातील महिला, पुरुष आणि तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. यावेळी बोलताना मान्यवरांनी युवकांच्या अथक परिश्रमांचे कौतुक केले. ग्रामीण भागातील युवकांमध्ये प्रचंड क्षमता असून योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव आणि आत्मविश्वासाच्या बळावर मोठे यश मिळविता येते, असे मत त्यांनी व्यक्त केले. सैन्यात निवड झालेल्या युवकांनीही आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, कुटुंबीय, शिक्षक आणि गावकऱ्यांच्या पाठिंब्याला दिले.

संगमवाडी गावातून एकाच वेळी पाच युवकांची भारतीय सैन्यात निवड होणे ही अत्यंत गौरवास्पद बाब मानली जात आहे. या यशामुळे गावातील इतर युवकांनाही सैन्य, पोलीस, वनरक्षक आणि इतर शासकीय सेवांमध्ये करिअर करण्याची प्रेरणा मिळणार आहे. युवकांच्या या यशाने संपूर्ण गावाचा आत्मविश्वास वाढला असून संगमवाडीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# शिंदोडी ग्रामस्थांचा संताप

**निष्काळजी ठेकेदाराविरोधात आंदोलनाचा इशारा**

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
शिरूर- प्रतिनिधी
इंद्रभान ओव्हाळ



**शिरूर :** शिरूर नगर परिषदेच्या पाणीपुरवठा योजनेसाठी शिंदोडी एमआयडीसी जॅकवेलवरून सुरूअसलेल्या पाईपलाईन कामात संबंधित ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे शिंदोडी ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट निर्माण झाली आहे. ओम साई वजनकाटा परिसरातील शिंदोडी-निमोणे मुख्य रस्त्यावर मुरूम, दगड व गोटे टाकून ठेवण्यात आल्याने वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झाला असून नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे.

याच ठिकाणी यापूर्वी झालेल्या अपघातात एका व्यक्तीचा पाय फ्रॅक्चर झाला असून, भविष्यात आणखी गंभीर अपघात झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित ठेकेदार सागर पवार व शिरूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी स्वीकारणार का, असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, पाईपलाईनचे काम करताना अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील पाण्याच्या पाईपलाईन फोडण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, नुकसान झालेल्या पाईपलाईनची दुरुस्ती करण्याकडे ठेकेदाराने पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून त्यांना पाण्याच्या गंभीर समस्येला सामोरे जावे लागत आहे. इतकेच नव्हे तर, शिंदोडी ग्रामस्थांसाठी अत्यंत महत्त्वाची असलेली जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजनेची पाईपलाईन देखील कामादरम्यान फोडण्यात आली असून ती अद्याप दुरुस्त करण्यात आलेली नाही. परिणामी ऐन उन्हाळ्यात अनेक कुटुंबांना पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे. एकीकडे शासन कोट्यवधी रुपये खर्च करून ग्रामीण भागाला शुद्ध पाणी पुरविण्याचा प्रयत्न करत असताना दुसरीकडे ठेकेदारांच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याची संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली. तसेच, अनेक शेतकऱ्यांच्या जमिनीमध्ये कोणतीही पूर्वपरवानगी न घेता खोदकाम करण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत विचारणा करणाऱ्या शेतकऱ्यांना दमदाटी केली जात असल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत.

संबंधित ठेकेदार सागर पवार यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी फोन उचलला नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

येत्या तीन ते चार दिवसांत रस्त्यावर टाकलेले मुरूम, दगड व गोटे हटवून रस्ता सुरक्षित करणे, शेतकऱ्यांच्या नुकसानग्रस्त पाईपलाईनची दुरुस्ती करणे तसेच जलजीवन मिशन योजनेची फोडलेली पाईपलाईन तातडीने पूर्ववत करणे, अन्यथा शिंदोडी ग्रामस्थ शिरूर नगर परिषदेच्या पाणीपुरवठा योजनेचे काम बंद पाडतील, असा कडक इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

गेल्या वर्षीही घोड धरणामध्ये विहीर घेताना त्यानंतर त्यावर स्लॅप भरताना साईडच्या बाजूला जो मुरूम लागतो तो एमआयडीसी जॅकवेल चा जो रस्त्याचा भराव आहे तो कोरून जेसीबी मशीनच्या साह्याने विहिरीच्या कडेला भरलेला आहे. गेल्या वर्षी एमआयडीसी अधिकाऱ्यांना तक्रार केलेली आहे. परंतु गेल्या वर्षी धरण भरल्यामुळे पंचनामा करता आला नाही आता तरी एमआयडीसीचे अधिकारी हा पंचनामा करतील का? का कॉन्ट्रॅक्टर शी हात मिळवणी करून गेल्या वर्षीच्या मुरमाचे प्रकरण बासनात बांधून ठेवतील का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. ‘नागरिकांच्या जीवाशी खेळणे, शेतकऱ्यांचे नुकसान करणे आणि गावाच्या पाणीपुरवठ्याशी बेफिकिरी करणे आता खपवून घेतले जाणार नाही,‘ असा संतप्त सूर शिंदोडी ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

# भविष्यात अरुण लखाणी राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष होतील

**भाजपने उमेदवारी देताच राऊतांचा खोचक टोला...**

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** आगामी विधानपरिषद निवडणुकीसाठी भाजपने आपल्या ११ उमेदवारांची घोषणा केली असून, यामध्ये नागपूरचे प्रसिद्ध उद्योगपती अरुण लखाणी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. अरुण लखाणी हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) खासदार सुप्रिया सुळे यांचे होणारे व्याही असल्याने या उमेदवारीमुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे. या सगळ्या प्रकरणावर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया देताना मोठे विधान केले.

**सुप्रिया सुळे यांचे व्याही भाजपच्या तिकिटावर रिंगणात !**

भाजपने जाहीर केलेल्या ११ उमेदवारांच्या यादीत चंद्रपूर-गडचिरोली-वर्धा या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून उद्योगपती अरुण लखाणी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. लखाणी हे अनेक वर्षांपासून भाजपचे निष्ठावंत पदाधिकारी आणि उद्योग जगतातील मोठे नाव आहेत. मात्र, त्यांची उमेदवारी सध्या कौटुंबिक आणि राजकीय समीकरणांमुळे संपूर्ण महाराष्ट्रात चर्चेचा विषय ठरली आहे. खासदार सुप्रिया सुळे यांची मुलगी रेवती सुळे आणि अरुण लखाणी यांचे सुपुत्र सारंग लखाणी यांचा विवाह ठरला आहे. त्यामुळे शरद पवार यांचे कुटुंब आणि लखाणी कुटुंब लवकरच नात्यात अडकणार आहेत.

**पंतप्रधान मोदींना दिले लग्नाचे आमंत्रण**

काही दिवसांपूर्वीच सुळे आणि लखाणी या दोन्ही कुटुंबांनी दिल्लीत जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली होती. यावेळी त्यांनी रेवती आणि सारंग यांच्या विवाह सोहळ्याचे निमंत्रण पंतप्रधान मोदींना दिले. या कौटुंबिक भेटीनंतर अवघ्या काही दिवसांतच भाजपने अरुण लखाणी यांना विधानपरिषदेच्या मैदानात उतरवल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

**‘ते भविष्यातील राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष होतील’; संजय राऊत**

अरुण लखाणी यांच्या उमेदवारीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. या उमेदवारीमुळे महाविकास आघाडीत कोणतीही अडचण येणार नाही, असे स्पष्ट करतानाच त्यांनी राष्ट्रवादीवर खोचक टीका केली. संजय राऊत म्हणाले, बहुतेक भविष्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष म्हणून अरुण लखानी यांच्यावर जबाबदारी टाकली जाईल. अरुण लखानी यांना तिकीट भाजपने दिलं आहे. त्यांची ती विचारसरणी आहे. यावर कार्यकर्त्यांनी काय करायचं असं विचारल्यावर संजय राऊत यांनी सुप्रिया सुळेंचा उल्लेख केला. अशावेळी कार्यकर्त्यांनी सुप्रिया सुळेंना प्रश्न विचारायचे असं राऊत म्हणाले.

# पैशांच्या वादातून शेतकऱ्यास मारहाण

**जीवे मारण्याची धमकी, दोघांविरुद्ध गुन्हा दाखल**

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मंठा - प्रतिनिधी
सुरेश ज्ञा. दवणे

**जालना (मंठा) :** तालुक्यातील केहाळ वडगाव येथील एका शेतकऱ्यास पैशांच्या कारणावरून शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी दोघांविरुद्ध मंठा पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा (एनसी) दाखल करण्यात आला आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी गजानन अंकुशराव दवणे (वय ४०, व्यवसाय शेती, रा. केहाळ वडगाव, ता. मंठा) यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपी अशोक पंढरीनाथ चौगुले व त्यांचा मुलगा (नाव अज्ञात), रा. जयपूर, काकडे ता. मंठा यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. तक्रारीनुसार, ३१ मे २०२६ रोजी दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास केहाळ वडगाव येथील फिर्यादीच्या शेतात ही घटना घडली. पैशांची मागणी केल्याच्या कारणावरून आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी मंठा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ अंतर्गत कलम ३५२, ३५१(२)(३) व ३(५) अन्वये एनसी क्रमांक २९५/२०२६ दाखल करण्यात आला असून पुढील प्रतिबंधात्मक कार्यवाही सुरूअसल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणाचा पुढील तपास व कार्यवाही मंठा पोलीस करीत आहेत.

# राज्यमार्ग १०३ वरील बेकायदेशीर जाहिरात फलकांवर PWD चा दणका

## १५७ अनधिकृत होर्डिंग्जविरोधात गुन्हा दाखल; सार्वजनिक संपत्तीच्या संरक्षणासाठी कठोर कारवाई

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
शिरूर - प्रतिनिधी
इंद्रभान ओव्हाळ

**शिरूर :** शिरूर -पाबळ राज्य मार्ग क्र.१०३ वरील सार्वजनिक बांधकाम विभागाने (PWD) उभारलेल्या दिशादर्शक फलकांवर बेकायदेशीर जाहिराती लावून सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण करणाऱ्यांविरोधात अखेर कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे. शिरूर उपविभागाने शिरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करत एकूण १५७ अनधिकृत जाहिरात फलकांप्रकरणी गुन्हा नोंदविला आहे.

या कारवाईत मंगलमूर्ती वास्तू प्रा. लि.चे १४३, दुर्वांकुर डेव्हलपर्सचे ८, ओमसाई डेव्हलपर्सचे ५ आणि स्वरा प्रॉपर्टीजचा १ फलक आढळून आल्याची माहिती समोर आली आहे. या सर्व जाहिराती शासकीय दिशादर्शक फलकांवर लावण्यात आल्याने वाहनचालकांसाठी आवश्यक माहिती झाकली जात होती आणि वाहतूक सुरक्षेलाही धोका निर्माण होत होता.

सामाजिक कार्यकर्ते निलेश वाळुंज यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यानंतर हा प्रकार प्रशासनाच्या निदर्शनास आला. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने दखल घेत संबंधितांविरोधात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३२४(३), ३२४(४), ३२४(५) तसेच महाराष्ट्र विद्रुपीकरण प्रतिबंधक अधिनियम १९९५ च्या कलम ३ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

**वाहतूक सुरक्षेशी थेट खेळ**

राज्यमार्गावरील दिशादर्शक फलक हे वाहनचालकांना मार्गदर्शन करण्यासाठी उभारलेले असतात. मात्र त्यावर मोठ्या प्रमाणात खाजगी जाहिराती लावल्याने महत्त्वाची माहिती झाकली जात होती. परिणामी चालकांचे लक्ष विचलित होऊन अपघाताचा धोका वाढत असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

**प्रशासनाच्या कारवाईचे नागरिकांकडून स्वागत**

सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण आणि जनहिताच्या प्रश्नांवर प्रशासनाने दाखविलेल्या तत्परतेचे नागरिकांकडून स्वागत केले जात आहे. या कारवाईमुळे भविष्यात सार्वजनिक संपत्तीचा गैरवापर करणाऱ्यांवर प्रभावी प्रतिबंध निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**निलेश वाळुंज यांची प्रतिक्रिया**

'सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शिरूर यांनी जनहिताच्या तक्रारीची गंभीर दखल घेत जबाबदारीने केलेली ही कारवाई सार्वजनिक मालमत्तेच्या संरक्षणासाठी राज्यभर आदर्श ठरेल. जागरूक नागरिक आणि कर्तव्यदक्ष प्रशासन यांची सांगड लागल्यास लोकशाही अधिक बळकट होते,' असे मत सामाजिक कार्यकर्ते निलेश वाळुंज यांनी व्यक्त केले.

**सार्वजनिक संपत्तीवर जाहिरातबाजी करणाऱ्यांना इशारा**

राज्यमार्ग क्र.१०३ वरील दिशादर्शक फलक विद्रुपीकरण प्रकरणात दाखल झालेला गुन्हा हा केवळ एक FIR नसून सार्वजनिक संपत्तीचा गैरवापर करणाऱ्यांसाठी स्पष्ट इशारा मानला जात आहे. प्रशासनाच्या या धडक कारवाईमुळे राज्यभरातील अशा प्रकारांना आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# वाशिममध्ये संभाजी ब्रिगेडचा भव्य पक्षप्रवेश सोहळा

※ 'मॉडेल १००' उपक्रम राज्यभर राबवणार - ॲड.मनोजदादा आखरे
※ शेतकरी, युवक आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा मोठ्या संख्येने जाहीर प्रवेश

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वाशिम - प्रतिनिधी
प्रताप नागरे

**वाशिम :** स्थानिक विश्राम भवन, वाशिम येथे संभाजी ब्रिगेडच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य कार्यकर्ता पक्षप्रवेश सोहळ्यात शेकडो युवक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी संभाजी ब्रिगेडमध्ये जाहीर प्रवेश केला. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंतीच्या औचित्याने आयोजित या कार्यक्रमात 'गावं तिथे कार्यकर्ता' मोहिमेचा आढावा घेण्यात आला.

कार्यक्रमाला संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ॲड. मनोजदादा आखरे प्रमुख उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, वाशिममध्ये राबविण्यात आलेला 'मॉडेल १००' उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला असून, हा उपक्रम आता संपूर्ण महाराष्ट्रभर राबविण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील युवक, शेतकरी आणि बहुजन समाजाला संघटित करून गावपातळीवर सक्षम नेतृत्व उभे करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरेल, असे त्यांनी स्पष्ट केले.



जिल्हाध्यक्ष गजानन भोयर यांच्या नेतृत्वाखाली वाशिम तालुक्यातील १२२ गावांमध्ये संभाजी ब्रिगेडचे कार्यकर्ते तयार करण्यात आले आहेत. 'गावं तिथे कार्यकर्ता' या मोहिमेमुळे गावागावांत संघटनात्मक बांधणी मजबूत होत असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष अधिक प्रभावीपणे उभा राहत असल्याचे चित्र दिसून आले.

प्रदेशाध्यक्ष ॲड. मनोजदादा आखरे यांनी सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना सांगितले की, अनेक राजकीय नेते स्वार्थासाठी पक्षांतर करत असल्याने सामान्य जनतेमध्ये नाराजी वाढत आहे. अशा परिस्थितीत सामाजिक न्याय, संविधानिक मूल्ये आणि बहुजन हिताच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेणाऱ्या संभाजी ब्रिगेडकडे जनता आशेने पाहत आहे. आगामी निवडणुकांमध्ये संभाजी ब्रिगेड प्रस्थापित पक्षांसमोर सक्षम पर्याय म्हणून उभी राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष गजानन भोयर यांनी सांगितले की, संभाजी ब्रिगेड आता केवळ आंदोलनापुरती मर्यादित न राहता पर्यायी नेतृत्व निर्माण करणारी जनआंदोलनाची शक्ती बनत आहे. युवक, महिला, विद्यार्थी, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक मोठ्या प्रमाणात संघटनेशी जोडले जात असून गावागावांत कार्यकर्त्यांची मजबूत फळी उभी राहत आहे.

यावेळी जिल्हा कार्यकारिणीची निवड, तालुकाध्यक्ष व तालुका पदाधिकाऱ्यांची नियुक्ती तसेच विविध गावांतील कार्यकर्त्यांच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या. कार्यक्रमात आगामी संघटनात्मक धोरण, जिल्हा परिषद सर्कलनिहाय बांधणी आणि गावपातळीवरील पक्ष विस्ताराबाबत महत्त्वपूर्ण चर्चा झाली.

कार्यक्रमास मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष नारायणराव काळबांडे, बुलढाणा जिल्हाध्यक्ष अमर पाटील, पांडुरंग पाटील, अकोला जिल्हाध्यक्ष नमन आंबेकर, संतोष भिसडे, विठ्ठल गंगावणे, महेश देवळे, गणेश सुर्वे, गजानन खंदारे, श्रीकृष्ण शिंदे, विकास देशमुख, नितेश पोहकर, राहुल बलखंडे, रमेश मुंजे, विजय झुंजारे, विष्णूभाऊ भोयर, परमेश्वर काळबांडे, इस्माईल खान पठाण, स्वातीताई भिमटे, बंडू भगत, तानाजी काळबांडे, अजय गवारगुरु, विनोद जाधव यांच्यासह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाचा समारोप 'जय जिजाऊ, जय शिवराय' आणि 'संभाजी ब्रिगेडचा विजय असो' या घोषणांनी उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

# श्रद्धेय विलासरावजी देशमुख यांच्या जयंती निमित्त कारला येथे ऊस विकास मेळावा संपन्न

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
औसा - प्रतिनिधी



## वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे मा शास्त्रज्ञ सुरेश माने पाटील यांच्या उपस्थितीत ऊस विकास मेळावा संपन्न

**औसा :** औसा तालुक्यातील कारला येथे श्रद्धेय विलासरावजी देशमुख यांच्या जयंतीनिमित्त व राष्ट्रमाता राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ जयंतीचे औचित्य साधून. श्री संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखाना बेलकुंड तर्फे कारला येथे ऊस विकास मेळाव्याचे आयोजन करण्यात आलं होतं या मेळाव्यासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे चे शास्त्रज्ञ सुरेश माने पाटील यांनी मेळाव्याला उपस्थित असणाऱ्या शेतकऱ्यांना ऊस लागवडी विषयी व ऊस पिकांची वाढ, ऊस उत्पादनात वाढ तसेच उसावर येणारे विविध रोग व किडीचे नियंत्रण व पाणी व्यवस्थापन याविषयी सखोल व शास्त्रीय पद्धतीने माहिती दिली, शेतकऱ्याशी संवाद साधत असताना शास्त्रज्ञ सुरेश माने पाटील यांनी शेतकऱ्यांना अगदी शेतीची मशागत ऊस लागवड खताचा वापर, फवारणी, सह शेती मशागत व ऊस लागवडीची पुरेपूर माहिती यावेळी दिली. शेतकऱ्यांनी मी सांगितलेल्या पद्धतीने ऊस लागवड केला तर येणाऱ्या काळात शेतकऱ्यांना अधिकचा नफा मीळणारच असे यावेळी सांगितले, औसा तालुक्यातील कारला येथे अधिकचे ऊस उत्पादक शेतकरी असल्याने श्री संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याचे विद्यमान संचालक विलास आबा काळे यांच्या माध्यमातून पहिला ऊस विकास मेळावा कारला येथे संपन्न झाला. यावेळी कारखान्याने शेतकऱ्यांना शंभर रुपयाचा हप्ता दिल्याने शेतकऱ्यांनी आनंद वक्त केला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रामदादा काळे, प्रमूख पाहुणे श्री संत शिरोमणी मारुती महाराज साखर कारखान्याचे व्हॉ चेअरमन सचिन पाटील, कारखान्याचे चेअरमन गणपतराव बाजुळगे, संचालक अनिल पाटील, संतोष भोसले, बाबासाहेब गायकवाड. गोविंद सोनटक्के.विलास काळे, कारखाना एम डी बहिर.

बाबासाहेब पाटील विश्वास काळे, गोविंद मुगळे राजू कारभारी, महादेव जाधव डॉ गोळे ,पांडुरंग काळे ,दत्ता काळे ,महेश जाधव ,श्रीमंत काळे ,बालाजी कदम ,दिगंबर काळे. शिवाजी काळे.दिलीप पाटील.अभंग जगताप.शिवाजी भोसले.विनोद झिरमिरे काशिनाथ हेंबाडे. दयानंद शेलुकर. दयानंद काळे. मुरलीधर काळे. रामचंद्र काळे विजयानंद काळे .अण्णासाहेब जाधव.कमलाकर पाटील. ज्ञानेश्वर जाधव. रमाकांत लामतुरे. इंद्रजीत कदम.राजू पारडकर. नागनाथ कलशेट्टी. शिवशंकर काळे.सिद्धेश्वर जाधव.कपिल शेलुकर.सात्विक शेलुकर.रमेश पवार. अशोक काळे.बालाजी काळे आबासाहेब काळे. रतन पेटकर गणेश मित्करी. सह परिसरातील शेतकरी व श्री संत शिरोमणी सहकारी साखर कारखाना बेलकुंड शेतकी अधिकारी भोसले साहेब वं शेतकी कर्मचारी उपस्थित होते.

# सेनगाव पोलीस ठाणे अंतर्गत हत्ता पाटी येथील जुगार अड्ड्यावर धाड

## ६ जुगारींसह ५४,६१० रुपयांचा मुद्देमाल जप्त

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
हिंगोली- प्रतिनिधी
देवरत्न गव्हाणकर

**हिंगोली :** परिविक्षाधीन पोलीस उपाधीक्षक मयूर रसाळ यांच्या पथकाने शेतकऱ्याच्या वेशात जाऊन टाकली धाड. हिंगोली जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांनी जिल्ह्यातील अवैध धंदे चालकांवर वेळोवेळी कठोर कारवाई करून त्यांचे धाबे दणाणून सोडले आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून, दिनांक ०१ जून २०२६ रोजी पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, परिविक्षाधीन पोलीस उपाधीक्षक मयूर रसाळ यांच्या पथकाला पोलीस स्टेशन सेनगाव हद्दीत जुगार अड्ड्यावर छापा टाकून कारवाई करण्यासाठी पाठवण्यात आले होते.



सदरचा जुगार अड्डा हा पोलीस स्टेशन सेनगाव अंतर्गत हत्ता पाटीपासून शेतशिवरामध्ये चालत होता. अड्ड्याचे ठिकाण शेतात असल्याने पोलिसांनी एक वेगळी युक्ती आखली. पोलीस पथकाने थेट शेतकऱ्याचा वेश परिधान केला आणि हत्ता पाटीपासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर असलेल्या शेतशिवारात अचानक छापा मारला.

या कारवाईत खालील जुगारींना ताब्यात घेण्यात आले आहे:

१) पुंबाजी लोभाजी गडदे (वय ५० वर्ष, रा. हत्ता पाटी)

२) ज्ञानबा कोंडूजी पादरे (वय ५५ वर्ष, रा. हत्ता पाटी)

३) अनिल कचरू साळवे (वय ५० वर्ष, रा. साखरा)

४) रवी गुलाब चव्हाण (वय ३७ वर्ष, रा. पातोंडा, तालुका सेनगाव)

५) भाऊराव रामराव पवार (वय ३५ वर्ष, रा. भानखेडा)

(सर्व राहणार तालुका सेनगाव, जिल्हा हिंगोली)

**मु मुद्देमाल जप्त आणि गुन्हा दाखल:**

ताब्यात घेतलेल्या आरोपींकडून पोलिसांनी ५२ पत्ते, ४ मोबाईल फोन आणि जुगाराचे साहित्य तसेच रोख रक्कम १४,६१० रुपये, असा एकूण ५४,६१०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोलीस स्टेशन सेनगाव येथे संबंधितांविरुद्ध मटका जुगार व तिरट नावाचा जुगार खेळल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**या पथकाने केली कारवाई:**

सदरची धडक कारवाई हिंगोलीचे पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन पोलीस उपाधीक्षक मयूर रसाळ (हिंगोली), पोनि स्थागुशा मोहन भोसले, सपोनि स्थागुशा श्री. शिवसांब घेवारे, तसेच पोलीस अंमलदार भुजंग कोकरे, संदीप जाधव, किशोर सावंत, हरिभाऊ गुंजकर आणि साईनाथ कंठे यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# ※ प्रेरणादायी गोष्ट ※

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

## मेणबत्ती आणि सूर्य



**एका लहानशा मेणबत्तीला खूप अभिमान होता.**

ती म्हणाली – 'मीच अंधार दूर करते, माझ्यामुळे लोकांना प्रकाश मिळतो. माझ्याशिवाय जगच अंधारात आहे.'

**सूर्य हसला आणि म्हणाला –**

'हो, तू प्रकाश देतेस हे खरं आहे. पण तुझा प्रकाश फक्त थोड्यावेळासाठी आणि थोड्याच जागेपुरता असतो.

माझा प्रकाश मात्र सर्व जगभर पोहोचतो आणि सर्वांना जीवन देतो.'

मेणबत्ती थोडी नाराज झाली. पण सूर्य पुढे म्हणाला –

'अगं बहिणी, तुझीही किंमत कमी नाही. रात्री मी नसतो तेव्हा तुझाच प्रकाश लोकांना आधार देतो. म्हणून आपल्यापैकी प्रत्येकाचं काम वेगळं आहे, पण महत्त्व सारखंच आहे.'

**※ शिकवण**

प्रत्येक व्यक्तीची किंमत आणि भूमिका वेगळी असते.

छोटं काम असो वा मोठं – जर ते लोकांच्या उपयोगाचं असेल तर त्याला महत्त्व आहे. तुलना न करता आपलं काम प्रामाणिकपणे करणं हीच खरी महानता आहे.

(पान १ वरून...)

## आमच्यावर अन्याय झाला...

२०२०) हा पराक्रम केला होता. सर्वाधिक आयपीएल खिताब जिंकण्याच्या यादीत मुंबई आणि चेन्नई ५-५ खिताबांसह पहिल्या, कोलकाता नाईट रायडर्स ३ खिताबांसह दुसऱ्या तर आरसीबी २ खिताबांसह तिसऱ्या स्थानावर पोहोचली आहे.


# जाहिर सूचना

दिनांक : ०२/०६/२०२६

नमस्कार,

दै चालु वार्ता कडून जाहिर करण्यात येथे की जर आमचा म्हणजेचं दै चालु वार्ताचा प्रतिनिधी आहे म्हणून कोणी दावा करत असेल तर त्याचं ID कार्ड पाहू शकता किंवा नियुक्ती लेटर सध्या जे आमचे पत्रकार आहेत त्याच्याकडे चालू कालावधीचे ID कार्ड किंवा नियुक्ती लेटर असतं तेंच आमचे पत्रकार आहेत. (कालावधी संपलेले ID किंवा नियुक्ती लेटर असेल आणि ते दै चालु वार्ताचा प्रतिनिधी असल्याचा दावा करत असतील तर ते खोटं आहे. तर आपण आमच्या कार्यालयात खालील नं वर संपर्ककरू शकता.) जर कालावधीच्या आतील त्यांच्याकडे ID किंवा नियुक्ती लेटर नसेल तर ते सध्या आमचे म्हणजे दै चालु वार्ताचे अधिकृत पत्रकार नाहीत. जरी त्यांच्या पेपरला बातम्या लागत असतील तरीही ते अधीकृत नाहीत (बातम्या पत्रकारच्या नावानी त्यांनी केलेल्या विनंती मुळे लावल्या जातात.)

**टीप :** दै चालु वार्ताच नियुक्ती लेटर किंवा ID ओरिजिनल आहे कसं कळणार. ओरिजिनल ID व नियुक्तीलेटर वर युन्कि रेफरन्स नं आहे जों Ref पासून सुरु होतो.

कार्यालय : जय चेम्बर, दुसरा मजला ऑफिस नं २०७, २०८ शिवाजी रोड स्वारगेट चौक पुणे, मो ९३७३५०४७४८



# जाहीर नोटीस

याद्वारे सर्व जनतेस सूचित करण्यात येत आहे की, बी-५०४, गगन इला, सर्व्हे नं. २३, एनआयबीएम रोड, महंमदवाडी, पुणे, महाराष्ट्र ४११०६० या पत्त्यावरील प्रॉपर्टीची मूळ कागदपत्रे हरवली आहेत/गहाळ झाली आहेत.

**जर कोणाला ही कागदपत्रे सापडली, तर त्यांनी कृपया खालील पत्त्यावर किंवा फोन नंबरवर संपर्क साधून ती परत करावीत:**

नाव: मनप्रित सिंग अरोरा
पत्ता: बी-५०४, गगन इला, सर्व्हे नं. २३, एनआयबीएम रोड, महंमदवाडी, पुणे, महाराष्ट्र ४११०६०
फोन: +९१ ८६६८२०२८९३

जर कोणी या कागदपत्रांचा गैरवापर केला किंवा त्याद्वारे कोणताही व्यवहार करण्याचा प्रयत्न केला, तर ते कायदेशीर कारवाईस पात्र ठरतील.

- मनप्रित सिंग अरोरा


This Daily Printed, Published and Owned by **Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** Printed at Girish Printers and Paper Converters, 150, Shaniwar Peth, Near Amruteshwar Mandir, Pune (M.S.)-411030 and Published at Flat No.806, 8 th Floor, Ratan Neptune, Handewadi Road, Hadapsar, Pune (M.S.)-411028 ■ **Editor : Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** ■ Mob No.: **9373504748** ■ Email **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (JURISDICTION AT PUNE)

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक **श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** यांनी गिरीष प्रिंटर्स अँड कन्व्हर्टर्स, १५०, शनिवार पेठ, अमृतेश्वर मंदिराजवळ, पुणे (महाराष्ट्र)- ४११०३० येथे छापून फ्लॅट नं.८०६, ८ वा मजला, रतन नेपच्युन, हंडेवाडी रोड, हडपसर, पुणे (महाराष्ट्र)-४११०२८ येथून प्रकाशित केले. ■ **संपादक - श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** ■ मो.नं.**9373504748** ■ Email - **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (सर्व वाद पुणे न्याय कक्षेत)




# हिंदू धर्मरक्षिणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती बालानगर येथे उत्साहात साजरी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**आडुळ सर्कल - प्रतिनिधी**
**आकाश साळवे**

**(आडुळ सर्कल) :** हिंदू धर्मरक्षिणी, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त ३१ मे रोजी बालानगर येथे विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. संपूर्ण गावात उत्साहाचे वातावरण असून जयंती मोठ्या जल्लोषात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली.



जयंतीनिमित्त सकाळी ६.०० वाजता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याची महाआरती करण्यात आली. यावेळी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पुण्यश्लोक अहिल्यादेवींना अभिवादन केले. परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. सायंकाळी ठीक ५.०० वाजता भव्य मिरवणुकीला प्रारंभ झाला. ढोल-ताशांच्या गजरात, पारंपरिक वेशभूषा आणि आकर्षक देखाव्यांसह मिरवणूक गावातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आली. या मिरवणुकीत बालानगरसह आजूबाजूच्या परिसरातील नागरिक, युवक, आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या जयंती उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच सर्व सदस्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनामुळे संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व स्तरांतून आयोजकांचे कौतुक करण्यात आले.

# सतीश येवले (पाटील) यांचा 'आदर्श सरपंच 'पुरस्कार साठी अमरावती जिल्ह्यातून पहिला प्रस्ताव..!

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**अमरावती - प्रतिनिधी**
**संजय सरवटकर**

**अमरावती :** राष्ट्राचा विकास हा ग्रामीण विकासावर अवलंबून असतो. आणि खेड्यातील विकास हा गावच्या मुखीया म्हणजे सरपंच यांच्यावर अवलंबून असतो. ग्रामीण भागात आपल्याला अनेक कर्तृत्ववान सरपंच, उपसरपंच दिसून येतात. सपंचांचा गावाच्या विकासात सिंहाचा वाटा असतो परंतु असे लोक सन्मानापासून वंचित असतात त्यांना त्यांच्या कार्याची पावती मिळत नाही म्हणून दैनिक चालू वार्ता व स्वाभिमानी



श्रमिक पत्रकार संघ (महाराष्ट्र राज्य) यांच्या संयुक्त विद्यमाने समाजासाठी, गावच्या विकासासाठी योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान सरपंच, उपसरपंच यांचा सन्मान व्हावा म्हणून २ऑगस्ट २०२६ ला 'आदर्श सरपंच' पुरस्काराचे आयोजन पुणे येथे करण्यात आले असून संपूर्ण महाराष्ट्रातून प्रस्ताव मागितले आहे. अशातच अमरावती जिल्यातील दर्यापूर तालुक्यातील खानपुर चिपर्डा गावचे माजी सरपंच सतीश शेषराव येवले (पाटील) यांनी आपला प्रस्ताव आयोजककडे पाठविल्याने जिल्यातून पहिल्या प्रस्तावाची नोंद केल्या गेली आहे. शेषराव येवले हे प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते म्हणून परिचित आहेत तसेच त्यांच्या काळात गावच्या विकासातही भर पडली आहे. त्यांनी पहिला प्रस्ताव पाठविल्या बद्दल स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघांचे दर्यापूर तालुका अध्यक्ष विजय हरणे पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

# बालाजी वानखडे यांचा शिवसेनेकडून सत्कार ओंकार काकडे यांचाही सन्मान

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**कारंजा लाड - प्रतिनिधी**
**अशोकराव उपाध्ये**

**कारंजा लाड :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या जिल्हाप्रमुखपदी बालाजी पाटील वानखडे यांची निवड झाल्याबद्दल कारंजा तालुका शिवसेनेच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला. यासाठी स्थानिक विश्रामगृहात ३० मे रोजी दुपारी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

बैठकीत पक्षाची ध्येय-धोरणे, संघटनात्मक बांधणी तसेच पक्ष विस्ताराबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. आगामी काळात पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकदुटीने कार्य



## सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध

करण्याचा निर्धार व्यक्त केला. सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष बालाजी वानखडे यांनी यावेळी केले. याच कार्यक्रमात वाशिम-यवतमाळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय भाऊ देशमुख यांनी कारंजा-मानोरा विधानसभा मतदारसंघाकरिता पुनश्च खाजगी 'पी ए' म्हणून नियुक्त केलेले ओंकार काकडे यांचा जिल्हाध्यक्ष बालाजी वानखडे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी ओंकार काकडे यांनी मतदारसंघातील जनतेच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी प्रामाणिकपणे कार्यरत राहण्याची ग्वाही दिली.

या प्रसंगी जिल्हा संघटक गजानन देशमुख, जिल्हा सहसंघटक सुधीर विल्हेकर, उपजिल्हाप्रमुख दत्ता पाटील तुरुक, तालुकाप्रमुख विलास पाटील सुरळकर, विधानसभा प्रमुख गोपाल पाटील येवतकर, विधानसभा बीएलओ माणिकराव पावडे पाटील, जगदीश पाटील थेर, स्वप्नील पाटील उपाध्ये, उप तालुकाप्रमुख विलास कडू, युवासेना तालुकाप्रमुख अविनाश पाटील दहातोंडे, महेश बांबल, विजय जमाले, बंडू पोटपिटे, सुरेश मिसाळ, भास्कर कडू, गोपाळ ठाकरे, मंगेश कराडे, गोपाळ थोरात, श्याम पाटील पावडे, शुभम पाटील वानखडे, हर्षल पवार, किरण तुपाडे, गोडसे, दिलीप पाटील रोकडे, नितीन गायकवाड, अफजल भाई, शंकर नेमाडे, अरुण बांडे, विष्णू लसणकुटे यांच्यासह शेकडो शिवसैनिक उपस्थित होते.

# आश्वासनाचा वाढदिवस, पण दिव्यांगांचा निधी अजूनही प्रतीक्षेत
## इलेक्ट्रिक स्कुटी द्या, आशीर्वाद घ्या - राहुल साळवे

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**नांदेड - प्रतिनिधी**
**शिलरतन लोखंडे**

**नांदेड :** नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील दिव्यांगांसाठी दरवर्षी राखीव असलेला आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत निधी खर्च करण्यात यावा, या मागणीसाठी गेल्या वर्षी जून महिन्यात आमदार बालाजी कल्याणकर यांच्या निवासस्थानावर अर्धनग्न अवस्थेत भिक मागो आंदोलन व आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. या आंदोलनाची दखल घेत आमदारांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन दिव्यांगांचा राखीव निधी खर्च करण्याचे आश्वासन दिले होते.



मात्र, त्या आश्वासनाला जवळपास एक वर्ष पूर्ण होत आले असतानाही मतदारसंघातील दिव्यांगांसाठी राखीव निधीचा अपेक्षित वापर झालेला दिसून येत नसल्याने दिव्यांग समाजामध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. आज आमदारांचा वाढदिवस विविध कार्यक्रमांनी साजरा केला जात असताना, वाढदिवसानिमित्त होणाऱ्या खर्चातून मतदारसंघातील गरजू दिव्यांगांना इलेक्ट्रिक स्कुटी, व्हीलचेअर, ट्रायसायकल, श्रवणयंत्र, कृत्रिम अवयव, शैक्षणिक साहित्य तसेच रोजगाराभिमुख साधनसामग्रीचे वितरण करण्यात आले असते तर हजारो दिव्यांग कुटुंबांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण झाला असता आणि त्यांचे आशीर्वाद मिळाले असते, अशी भावना व्यक्त होत आहे.

दिव्यांगांच्या नावाने राखीव असलेला निधी प्रत्यक्ष दिव्यांगांच्या कल्याणासाठी वापरणे ही लोकप्रतिनिधींची नैतिक व सामाजिक जबाबदारी आहे. त्यामुळे नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील दिव्यांगांसाठी राखीव निधी तात्काळ खर्च करून त्याचा तपशील सार्वजनिक करावा व पात्र दिव्यांगांना लाभ वितरित करावेत, अशी मागणी सकल दिव्यांग संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे.

दिव्यांग समाजाला आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष मदतीची गरज असून, वाढदिवसाच्या शुभेच्छांपेक्षा दिव्यांगांच्या जीवनात परिवर्तन घडविणारे निर्णय अधिक महत्त्वाचे असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

# मैत्री फाऊंडेशन जांभूळ-वसत आयोजित गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**ठाणे ग्रामीण - प्रतिनिधी**
**विकी जाधव**

**कल्याण :** मैत्री फाऊंडेशन, जांभूळ-वसत यांच्या वतीने आयोजित इयत्ता १० वी व १२ वी गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा २०२६ हा कार्यक्रम रविवारी (दि. ३१ मे) सायंकाळी ५.३० वाजता ग्रामपंचायत खुले व्यासपीठ, वसत येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. अनेक वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येणाऱ्या या सामाजिक उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सन्मान करत शिक्षण आणि करिअरबाबत सकारात्मक दिशा देण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. रिया रुपेश राणे यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला तसेच ग्रामस्थांचेही स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मैत्री फाऊंडेशनचे अध्यक्ष रुपेश मारुती राणे यांनी संस्थेची प्रस्तावना मांडली. त्यांनी संस्थेमार्फत विविध सामाजिक, शैक्षणिक व समाजोपयोगी उपक्रम अनेक वर्षांपासून राबविले जात असल्याची माहिती उपस्थितांना दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साईकृपा विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक साहेबराव महाजन सर होते. प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा. सौ. प्राची पाटील मॅडम, करिअर मार्गदर्शक




## करिअर मार्गदर्शन, शिक्षणाचे महत्त्व आणि विद्यार्थ्यांना नवी दिशा देणारा उपक्रम

राजेश्वर दाभाडे सर तसेच निवृत्त नायब तहसीलदार नारायण मोहपे उपस्थित होते.

करिअर मार्गदर्शक राजेश्वर दाभाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स या तिन्ही शाखांमध्ये समान संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी कोणत्याही गैरसमजात न राहता स्वतःच्या आवडी, मेहनत आणि सातत्यावर विश्वास ठेवून पुढे जावे, असे त्यांनी सांगितले. यशासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना तीन महत्त्वाची सूत्रे दिली. ध्येय निश्चित करणे (Purpose/Objectives), योग्य रोडमॅप तयार करणे आणि स्वतःच्या कौशल्यांची ओळख करून त्यांचा विकास करणे. या तीन गोष्टींवर लक्ष केंद्रित केल्यास यश निश्चितपणे मिळते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच शैक्षणिक मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःहून संपर्क साधल्यास सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. प्रा. सौ. प्राची पाटील यांनी ग्रामीण भागातील बोलीभाषेत विद्यार्थ्यांशी संवाद साधत विशेषतः मुलींना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. मुलींनी शिक्षण आणि करिअरमध्ये सातत्य ठेवून स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा निर्धार करावा, शिक्षण हेच भविष्यातील सर्वात मोठे बळ असल्याचा संदेश त्यांनी दिला.


कार्यक्रमाध्यक्ष साहेबराव महाजन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कल्याण तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी मुंबई हे मोठ्या संधीचे केंद्र असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून उच्च शिक्षणासाठी पुढे यावे आणि जांभूळ-वसत गावातून भविष्यात उच्च पदांवर पोहोचणारे अधिकारी तयार व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार व गुणगौरव करण्यात आला. तसेच इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा देत संदेश देण्यात आला की, एखाद्या वेळी अपेक्षित यश मिळाले नाही तरी निराश न होता नव्या जोमाने प्रयत्न सुरूठेवावेत; कारण अपयश ही यशाची पहिली पायरी असते.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने ग्रामस्थ, पालक, गुणवंत विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमासाठी वैभव सावंत, सुनील सावंत, चिंतामण ताम्हाणे, श्रीम. करुणा शिर्के, सौ. सविता मेहतर, सौ. हेमांगी पवार, सचिन राणे, मंगेश राणे यांचे साहाय्य लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एकनाथ साळुंखे, जगदिश कडव, प्रशांत सावंत, कमलाकर आयरेकर, हनुमान आयरेकर, रुपेश राणे, सौ.रिया राणे यांनी मेहनत घेतली. या वेळी दैनिक चालू वार्ताचे पत्रकार विकी जाधव हे देखील उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आणि ग्रामीण भागातील युवकांना दिशा देण्यासाठी आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम उपस्थितांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वीरीत्या पार पडला.

# सटाणा अमधाम मधील आक्षेपार्ह प्रकरणावरुन अज्ञात मांत्रिकाविरुद्ध गुन्हा दाखल

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**सटाणा - प्रतिनिधी**
**अमोल बच्छाव**



**सटाणा :** सटाणा शहरातील जुन्या अमरधाम (स्मशानभूमी) येथे दि. ३० मे पौर्णिमाच्या मध्यरात्री चिता जाळली जाते त्या जागेवर भगवे वस्त्र धारण केलेला मांत्रिक आणि अन्य व्यक्ती यांकडून आक्षेपार्ह पुजाविधी आणि जादूटोणा सारखा धक्कादायक प्रकार केल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी सटाणा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी आणि एका मांत्रिकाविरुद्ध जादूटोणा विरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक ३० मे २०२६ रोजी पौर्णिमेच्या मध्यरात्री ११:४० ते ११:४५ वाजण्याच्या सुमारास जुन्या अमरधाम परिसरात दोन आलिशान चारचाकी गाड्यांमधून (फॉर्च्युनर आणि मारुती) काही संशयास्पद व्यक्ती आल्या. त्यांच्यासोबत एक मांत्रिक होता.

या टोळीने अमरधाममधील चिता जाळली जाते त्या ठिकाणी जाऊन, अंधश्रद्धा पसरवण्याच्या व अघोरी कृत्य करण्याच्या उद्देशाने विधी सुरू केला. पूजा करताना त्यांनी अंडी, लिंबू, उडीद, कवड्या, कापूर, नारळ, पुष्प आणि कुंकू यांसारख्या तांत्रिक साहित्याचा वापर करून अघोरी पूजा केली. विधी संपल्यानंतर तेथून काही संशयास्पद वस्तू गोळा करून हे सर्वजण वाहनांमधून पसार झाले.

मध्यरात्रीच्या सुमारास गाड्यांची आणि लोकांची संशयास्पद हालचाल पाहून स्थानिक नागरिक अमोल बाळासाहेब बच्छाव आणि त्यांचे मित्र दत्ता पवार, खुशाल भोसले, प्रथमेश पाटोळे, अजय बच्छाव व इतर सहकाऱ्यांनी तातडीने अमरधाम परिसरात जाऊन पाहणी केली. त्यावेळी घटनास्थळावर अघोरी वाटेल अशी पूजा आणि जादूटोणा सारखा प्रकार करण्यात आल्याचे ढळढळीत पुरावे आढळून आले. हा संपूर्ण प्रकार परिसरातील सीसीटीव्ही (CCTV) कॅमेऱ्यांमध्ये देखील कैद झाला आहे.

याप्रकरणी प्रा. अमोल बाळासाहेब बच्छाव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सटाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 'महाराष्ट्रनरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा आणि जादूटोणा यांना प्रतिबंध व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३' चे कलम ३(२) तसेच भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३ च्या कलम २९९ अन्वये गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक (पोउपनिरीक्षक) सूर्यवंशी करत आहेत. या अघोरी पूजेच्या प्रकारामुळे सटाणा शहरात आणि परिसरात तीव्र संताप व खळबळ उडाली असून, अंधश्रद्धा पसरवणाऱ्या या विकृत टोळीला लवकरात लवकर अटक करण्याची मागणी होत आहे.

# अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त उदगीर काँग्रेस आय कडून त्रिवार अभिवादन!

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
**उदगीर - प्रतिनिधी**
**संतोष रायफळे**

**उदगीर :** आज उदगीर येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती दिनानिमित्त उदगीर काँग्रेस आय (INC) परिवाराच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आणि अभिवादन करून जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. अहिल्यादेवी होळकर या केवळ एक राणी नव्हत्या, तर त्या एक आदर्श प्रशासक, न्यायप्रेमी शासक आणि समाज सुधारक होत्या. त्यांच्या



काळात त्यांनी अनेक मंदिरे, धर्मशाळा, आणि लोकांच्या सेवेसाठी अनेक कामे उभारली. त्यांची न्यायबुद्धी आणि कर्तव्यनिष्ठा आजही आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांना आणि कार्याला त्रिवार मानाचा मुजरा!

जय जिजाऊ! जय शिवराय! जय अहिल्या!

याप्रसंगी उदगीर काँग्रेसचे शहराध्यक्ष मंजूर खान पठाण, ओबीसी तालुका अध्यक्ष दत्ता सुरनर, युवक शहर अध्यक्ष आदर्श सोनू पिंपरे ,पंचायत समिती गट नेते अँड भास्कर पाटील, पंचायत समिती सदस्य बालाजी अंधारे, चंद्रकांत खटके, आशिष पाटील राजुरकर,विजयकुमार चवळे,ओमकार जयश्री गांजुरे, नागेश पटवारी, प्रभाकर पाटील, ज्ञानेश्वर टाळकुटे, वैभव करले आणि सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.



# राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

## लोणी बु.ग्रामस्थांनी जोडीने केली महाआरती



दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वैजापूर - प्रतिनिधी
अनिल सूर्यवंशी

**वैजापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त वैजापूर तालुक्यातील लोणी बु.येथे भक्तीमय वातावरण पाहायला मिळाले. जयंतीच्या शुभमुहूर्तावर सकाळी ७:३० वाजता राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याचे पूजन आणि महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. या मंगलप्रसंगी गावातील सर्व ग्रामस्थांनी एकत्र येत पदाधिकाऱ्यांनी अहिल्यादेवींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या सोहळ्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, गावातील सर्व ग्रामस्थांनी सहकुटुंब, (जोडीने) या महाआरतीमध्ये सहभाग घेतला.गावातील एकोपा आणि सलोखा वाढीस लागावा या उद्देशाने अनोखा निर्णय ग्रामस्थांनी घेतला होता. या आवाहनाला प्रतिसाद देत तरुण, वृद्ध आणि नवविवाहित जोडप्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आरतीचा लाभ घेतला. एकत्रितपणे झालेल्या या महाआरतीने संपूर्ण परिसरात एक वेगळीच ऊर्जा निर्माण केली. ?

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन आणि त्यांचे कार्य अखंड समाजासाठी मार्गदर्शक आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त गावातील सर्व पदाधिकारी आणि ग्रामस्थ पुतळा परिसरात एकत्र येणे, हे गावच्या एकतेचे प्रतीक आहे. असे लोणी बुद्रुक येथील ग्रामस्थांनी सार्वजनिक मत व्यक्त केले.

# उन्हाळ्यात व्होल्टेज फ्लक्च्युएशनचा त्रास ?

## घाबरू नका, टीव्हीसाठी स्टॅबिलायझर आहे ना !

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

व्ही-गार्ड डिजिटल स्टॅबिलायझरमुळे तुम्हाला व्होल्टेज फ्लक्च्युएशनमुळे टीव्हीच्या होणाऱ्या नुकसानाबद्दल विचार करावा लागणार नाही. LCD, LED आणि 3D टेलिव्हिजन सारख्या तुमच्या महागड्या मनोरंजन गॅझेट्ससाठी संरक्षण गियर निवडताना V-Guard डिजिटल स्टॅबिलायझर हे सर्वोत्तम प्रॉडक्ट आहे.




स्टॅबिलायझर्स हे अत्यावश्यक असले तरी अनेकदा त्याकडे दुर्लक्ष केलं जातं. खरंतर आपल्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या सुरक्षेत स्टॅबिलायझर्स महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. विशेषत: भारतासारख्या देशात फ्लक्च्युएशन आणि वीजप्रवाह खंडित होणं ही सामान्य समस्या आहे. अशा ठिकाणी स्टॅबिलायझर्सचा वापर अत्यावश्यक ठरतो. अनेक ग्राहक त्यांच्या टीव्हीसाठी स्टॅबिलायझर्सच्या असलेल्या आवश्यकतेकडे दुर्लक्ष करतात. अस्थिर वीज पुरवठ्यामुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांची कल्पना त्यांना नसते.

व्होल्टेज फ्लक्च्युएशनमुळे येणारी अस्थिरता वाढू शकते आणि त्यामुळे इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या, विशेषत: घरांमधील टेलिव्हिजनच्या दीर्घायुष्यासाठी आणि कार्यक्षमतेसाठी धोका निर्माण करू शकते. योग्य संरक्षण नसेल तर टीव्हीची कार्यक्षमता कमी होणे, जास्त गरम होणे, इन्सुलेशनचे नुकसान आणि कायमस्वरूपी बिघाड होणे असे प्रॉब्लेम्स निर्माण होऊ शकतात. अपुऱ्या वीज पुरवठ्यामुळे कार्यक्षमता कमी होऊ शकते आणि वीज पुरवठा युनिट आणि सर्किट बोर्ड यांसारख्या अंतर्गत घटकांचे नुकसान होऊ शकते. अशा उपकरणांसाठी तयार केलेल्या व्होल्टेज स्टॅबिलायझरमध्ये गुंतवणूक केली, ते इन्स्टॉल केले तर महागड्या उपकरणांना धोका पोहोचण्याची जोखीम कमी होते आणि त्यांचे आयुष्य वाढू शकते.

स्टॅबिलायझरचा मूलभूत उद्देश समजून घेणे हे महत्त्वाचे आहे. फ्लक्च्युएटिंग इनपुट व्होल्टेजमध्ये स्थिर व्होल्टेज आउटपुट राखून, ते बूस्ट रेग्युलेशनची आवश्यक कार्ये करतात. V-guard Crystal TT सिरीज सारखे आधुनिक स्टॅबिलायझर्स हे ॲडव्हान्स्ड (प्रगत) डिजिटल कंट्रोल सर्किट्स किंवा सॉलिड-स्टेट तंत्रज्ञान वापरतात. त्यामुळे इनपुट आणि आउटपुट व्होल्टेज मॉनिटरिंगसाठी अधिक अचूक नियमन आणि युजर-फ्रेंडली इंटरफेस देतात.

**ऑप्टिमल व्होल्टेज रेग्युलेशन**

टीव्हीसाठी असलेला स्टॅबिलायझर हा स्थिर व्होल्टेज पुरवठा मिळेल हे सुनिश्चित करतो , तसेच तुमच्या टीव्हीचे ओव्हरव्होल्टेज किंवा अंडरव्होल्टेज पासूनही संरक्षण करते. एवढंच नव्हे तर हे पॉवर ग्रिड समस्यांमुळे किंवा इलेक्ट्रिकल वायरिंगमधील बिघाडांमुळे अचानक होणाऱ्या पॉवर फ्लक्च्युएशनपासून तुमच्या टीव्हीच्या अंतर्गत सर्किटरीचे प्रभावीपणे संरक्षण करते. सातत्यपूर्ण व्होल्टेज पातळी राखण्यावर लक्ष केंद्रित करून, तुमचा टीव्ही सुरळीतपणे चालेल, योग्य कार्य करेल यावर भर देते. V-Guard ने ग्राहकांना यासाठी अनेक पर्याय उपलब्ध करून दिले आहेत.

**उपकरणांचे आयुष्य वाढतं**

तुमच्या टीव्हीसाठी स्टॅबिलायझर वापरल्याने त्याचे आयुष्य लक्षणीयरीत्या वाढते. तुमच्या टीव्हीचे विजेच्या अनियमिततेपासून संरक्षण करते, तसेच पॉवर सप्लाय बोर्ड, मेनबोर्ड आणि डिस्प्ले पॅनल यांसारख्या संवेदनशील घटकांना नुकसान होण्याचा धोकाही कमी करते. तुमचा टीव्ही पुढील काही वर्षांपर्यंत व्यवस्थित चालत राहील हे (स्टॅबिलायझर) सुनिश्चित करतो. तसेच महागडी दुरूस्ती किंवा अकाली टीव्ही बदलण्याची गरज लागणार नाही, याची काळजी देखील स्टॅबिलायझर घेतो. त्यामुळे V-Guard सारख्या उत्पादनात एकवेळ गुंतवणूक करून तुम्ही तुमच्या टीव्हीचे आयुष्य वाढवू शकता.

**टीव्हीसाठी योग्य स्टॅबिलायझर कसा निवडाल?**

**क्षमता :** वेगवेगळ्या आकाराच्या स्मार्ट टीव्हीचे संरक्षण करण्यासाठी व्ही-गार्ड स्टॅबिलायझर्स हे वेगवेगळ्या कॅपॅसिटीनुसार, क्षमतेनुसार डिझाइन केले आहेत. ते तुमचा सेट-टॉप बॉक्स, होम थिएटर सिस्टम आणि गेमिंग कन्सोलला देखील सपोर्ट करू शकतात.

**व्हिज्युएल इंडिकेटर :** तुम्ही क्लिअर व्होल्टेज डिस्प्ले असलेले स्टॅबिलायझर्स शोधू शकता, सहज वाचण्यासाठी त्यामध्ये एलईडी इंडिकेटर्सही असतात. हे तुम्हाला तुमच्या डिव्हाइसवर जाणाऱ्या आउटपुट व्होल्टेजचे निरीक्षण करण्याची परवानगी देतात.

**माउंटिंग ऑप्शन :** भिंतीवर लावण्यायोग्य स्टॅबिलायझर वापरणे हा एक सुरक्षित पर्याय आहे. त्यामुळे त्याचे पाण्यापासून नुकसान होत नाही आणि मुलांचा हातही तिथवर पोहोचू शकत नाही, त्यामुळे सुरक्षित राहू शकतो. व्ही-गार्ड डिजिटल स्टॅबिलायझरमुळे तुम्हाला व्होल्टेज फ्लक्च्युएशनमुळे टीव्हीच्या होणाऱ्या नुकसानाबद्दल विचार करावा लागणार नाही. LCD, LED आणि 3D टेलिव्हिजन सारख्या तुमच्या महागड्या मनोरंजन गॅझेट्ससाठी संरक्षण गियर निवडताना V-Guard डिजिटल स्टॅबिलायझर हे सर्वोत्तम प्रॉडक्ट आहे. त्याचा आणखी एक फायदा म्हणजे, तुम्ही त्या प्रॉडक्टच्या पॅकेजिंग बॉक्सवर दिलेला QR कोड स्कॅन करून अस्सल V-GUARD उत्पादनाची पडताळणी करू शकता.

# शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाच्या संघटन विस्तारासाठी चंदगड येथे शिवसैनिकांची बैठक

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
चंदगड - प्रतिनिधी
संदिप कांबळे



**चंदगड :** शिवसेना नेते, खासदार तथा शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाचे अध्यक्ष अनिलभाऊ देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ग्राहक संरक्षण कक्षाचे सरचिटणीस निखिल सावंत यांच्या सूचनेनुसार कोल्हापूर जिल्ह्यात संघटन विस्तार व पदाधिकारी निवडीच्या अनुषंगाने बैठकीचे आयोजन करण्यात आले. शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाचे कोल्हापूर जिल्हा समन्वयक (संपर्क प्रमुख) मा. श्री. कृष्णकांत शिंदे तसेच जिल्हाप्रमुख मा. दिनेश शांताराम कुंभीरकर यांच्या उपस्थितीत शुक्रवार, दि. २९ मे २०२६ रोजी आजरा व चंदगड येथे शिवसैनिकांच्या भेटीगाठी व मुलाखती पार पडल्या. चंदगड येथे दुपारी ३ वाजता आयोजित बैठकीत ग्राहक संरक्षण कक्षामध्ये कार्य करण्यास इच्छुक असलेल्या शिवसैनिकांशी संवाद साधण्यात आला.

या बैठकीस शिवसेना तालुकाप्रमुख विष्णू गावडे, चंद्रकांत गावडे, विठ्ठल कांबळे, संतोष पेडणेकर, किरण सुतार, संदीप नाईक यांच्यासह तालुक्यातील अनेक शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी शिवसेनेचे संस्थापक हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा जागर करण्यात आला. '८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण' या सूत्रानुसार कार्य करत प्रखर हिंदुत्व, मराठी माणसाचे हक्क आणि जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

ग्राहक संरक्षण कक्षाच्या माध्यमातून गावागावातील व प्रभागातील स्थानिक प्रश्न सोडविण्यासाठी प्रभावी कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच संघटनात्मक शिस्त, एकजूट आणि मातोश्रीकडून मिळणाऱ्या आदेशांचे पालन करत शिवसेनेची ताकद अधिक मजबूत करण्याचा संदेश उपस्थितांना देण्यात आला.

# कुरुडगी ते नरंगल डांबरीकरण रस्त्यावर जेसीबीने खोदकाम

## रस्ता उखडून टाकल्याने गावकऱ्यांचे उपजिल्हाधिकारी कार्यालयासोर आमरण उपोषण

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
देगलूर - प्रतिनिधी
संतोष मंनधरणे




**देगलूर :** देगलूर तालुक्यातील कुरुडगी ते नरंगल स्वातंत्र्यानंतर प्रथमच डांबरीकरणचा रस्ता करण्यात आला पण गावातील एका व्यक्तीने सत्तेचा दुरुपयोग करुन बळजबरीने रातोरात जेसीबी मशीन द्वारे रस्त्याच्या लगतच बेकायदेशीर नाला खोलीकरण केल्याने बाजुला असलेल्या वाईटचे खांब आधार नसल्याने पोल केव्हाही कोसळून लाईटची लाईन बंद होऊ शकतो व नाला खोदल्याने पावसाचे पाणी जमा होऊन रस्त्या वाहून जाण्याची शक्यता आहे त्यामुळे खोदलेला नाला त्वरित बुजून टाकून रस्ता दुरुस्त करून देण्यात यावेत.


यासाठी कुरुडगी येथील सर्व पक्षीय पदाधिकारी, माजी सरपंच, माजी उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शेतकरी शेतमजूर मोठ्या संख्येने देगलूर येथील उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोरील आमरण उपोषणाला बसले आहेत रस्ता व नाला त्वरित बुजून टाकून रस्ता दुरुस्त न केल्यास दि.२ जुन रोजी नांदेड हैदराबाद रस्त्यावर उतरून रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे. या आमरण उपोषणाला शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील देगलूर शिवसेना शहरप्रमुख भगवान जाधव, युवा सेना शहर समन्वयक संतोष कांबळे आदीनी भेट देऊन शिवसेनेच्या वतीने पाठिंबा दिला आहे यावेळी उमाकांत पाटील, मधुकर पाटील बाबुराव पाटील, राजेंद्र पाटील, व्यंकट पाटील माणिकराव कोकाटे, दिंगबर कोकले, विठ्ठल मजरे, नागनाथ मजरे, शिवलिंग अप्पा महादेवरन, राजेंद्र रेवपवार, गणपत कोकणे, शैषेराव मजरे, मारोतराव मजरे, माधवराव कोकणे, संभप्पा स्वामी, महादप्पा स्वामी, शेषेराव कोकणे, रेशन अप्पा महादेवरन, माधव शेटकार, बालाजी कोकणे, नामदेव मजरे, सुभाष शेटकार, रमेश शेटकार आदींसह अनेक नागरिक आमरण उपोषणाला बसले आहेत.

# हे तुम्हांला माहिती आहे का ?

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

१) आपलं हृदय दररोज सुमारे १ लाख वेळा धडकतं आणि आयुष्यात सुमारे ३ अब्ज वेळा धडके देते.
२) सूर्याच्या प्रकाशाला पृथ्वीपर्यंत पोहोचायला फक्त ८ मिनिटे २० सेकंद लागतात!
३) भारतामध्ये जगातील सर्वात मोठं डाकजाळं (पोस्ट नेटवर्क) आहे
१.५ लाखांहून अधिक पोस्ट ऑफिस!
४) आपण झोपेत असताना मेंदू जागेपणीपेक्षा जास्त सक्रिय असतो.
५) जगातला पहिला संगणक इ.स. १८२२ मध्ये चार्ल्स बॅबेज यांनी तयार केला होता.
६) आपल्या शरीरातील सगळ्यात मजबूत स्नायू म्हणजे जिभेचा स्नायू (Tongue muscle) आहे.
७) एका झाडामुळे दरवर्षी सुमारे ४ लोकांना ऑक्सिजन मिळतो.
८) चिंतेने घालवलेला १ तास तुमचं शरीर ५ तासांइतकं थकवतं!
९) जगातले बहुतेक करोडपती रोज सकाळी वाचन आणि ध्यान करतात.
१०) तुमच्या स्मितहास्यामुळे इतरांचा मूड वैज्ञानिकदृष्ट्या सुधारतो!
११) पृथ्वीवर दररोज ८.६ दशलक्ष वीज चमकते!
१२) मोबाईलचा सर्वात मोठा शोध १९७३ मध्ये मार्टिन कूपर यांनी लावला होता.
१३) 'लक्ष्य ठरवा आणि रोज त्यासाठी एक पाऊल उचला'
हे जगातील सर्व यशस्वी लोकांचं गुपित आहे!
१४) आपल्या शरीरातील रक्तवाहिन्या जर एकमेकांना जोडल्या तर
त्या सुमारे ९९,००० किमी लांब होतील!
१५) सकारात्मक विचार केल्याने मेंदू डोपामाइन सोडतो, ज्यामुळे तुम्ही आनंदी आणि ऊर्जावान होता!





✻ टीप : वरील माहितीची दैनिक चालु वार्ता वृत्तपत्र कोणत्याही प्रकारे पुष्टी करत नाही

# आजचे राशि भविष्य

**मेष :** ज्येष्ठांनी त्यांच्या तब्येतीला जपून राहण्याची गरज आहे. झटपट पैसा कमावण्याची तुम्हाला इच्छा होईल. स्वयंपाकघरातील महत्त्वाच्या उपयोगी वस्तूंच्या खरेदीमध्ये तुमची संध्याकाळ व्यस्त राहील.

**वृषभ :** पुरातन वस्तू आणि दागदागिन्यांमधील गुंतवणूक फायदा आणि समृद्धी आणेल. नोतवाईक व मित्रमंडळींकडून अनपेक्षित भेटवस्तू मिळतील.

**मिथुन :** तुमचे मनमोकळे आणि निडर विचार तुमच्या मित्राला तुमचा गर्व आहे असे वाटून तो दुखावला जाईल. तुमचा शेजारी आज तुमच्याकडून धन उधार मागण्यास येऊ शकतो.

**कर्क :** तुमच्या अवतीभवतीचे लोक खूप कामाचा अपेक्षा तुमच्याकडून करतील - परंतु जेवढे काम तुम्ही करूशकता तेवढ्याचेच वचन द्या - आणि फक्त अशा लोकांना खुष ठेवण्यासाठी कामाचा ताण घेऊन दमून जाण्याची गरज नाही.

**सिंह :** तुमच्या सर्व अडचणी, समस्यांवर हसत हसत मात करणे हाच उत्तम उपाय ठरतो. संयुक्त प्रकल्पात आणि संशयास्पद आर्थिक योजनांमध्ये गुंतवणूक करू नका.

**कन्या :** तुमचे आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्न करण्यास लाभदायक दिवस. मित्रांच्या मदतीमुळे आर्थिक अडचण सुकर होईल. तुम्ही साजरे करण्याच्या मूडमध्ये असाल आणि कुटुंबातील सदस्य तसेच मित्रमंडळी यांच्यासाठी खर्च करून मजा लुटाल.

**तुळ :** कार्यालयातून लवकर बाहेर पडण्याचा प्रयत्न करा आणि ज्या गोष्टी तुम्हाला आवडतात त्याच करा. तुमच्या वडिलांचा सल्ला आज तुम्हाला कामाच्या क्षेत्रात धन लाभ करवून देऊ शकते.

**वृश्चिक :** भीती, चिंता तुमच्या सुखी समाधानी, आनंदी जगण्याला मारक ठरूशकते. आपल्या विचारांमधून आणि कल्पनांमधूनच चिंतेचा जन्म झाला आहे हे तुम्हाला लक्षात ठेवावे लागेल.

**धनु :** तुमच्या प्रकृतीची काळजी घ्या. दिवसाच्या उर्वरित काळात पैशांची स्थिती सुधारेल. आजच्या दिवशी मुलं आणि कुटुंबावर लक्ष केंद्रीत करा.

**मकर :** दीर्घ आजाराशी लढा देताना स्वत:वरचा विश्वास हाच तुम्हाला हिरो ठरवू शकतो, हे ओळखा. कोणतीही गुंतवणूक घाईगडबडीत करू नका. गुंतवणुकीचा सर्व बाजूंनी विचार केल्याशिवाय पुढे जाऊ नका, अन्यथा नुकसान होऊ शकते.

**कुंभ :** मित्रमैत्रिणींबरोबरची सायंकाळ सुखकारक आणि प्रसन्न असेल, पण अतिखाणे आणि मद्यपान त्रासदायक ठरूशकते. धन तुमच्यासाठी गरजेचे आहे .

**मीन :** क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होऊन तुम्ही शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहाल. आपली गुंतवणूक आणि भविष्यातील ध्येयांबद्दल गुप्तता बाळगा.



# पुणे जिल्ह्याचा आर्यन नम्रता अशोक ढवळे प्रो कबड्डीच्या मैदानात

## महाराष्ट्रातील पहिला ‘न्यू यंग प्लेयर’ म्हणून तेलुगू टायटन्सकडून खेळणार

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**पिंपरी चिंचवड - प्रतिनिधी**



**पिंपरी चिंचवड :** पुणे जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानास्पद बातमी समोर आली आहे. बाणेर येथील २१ वर्षीय आर्यन नम्रता अशोक ढवळे याची प्रो कबड्डी लीगच्या १३ व्या आणि १४ व्या हंगामासाठी तेलुगू टायटन्स संघात ‘न्यू यंग प्लेयर’ म्हणून निवड झाली आहे. यावर्षी महाराष्ट्रातून प्रो कबड्डीमध्ये स्थान मिळवणारा तो पहिलाच अष्टपैलू खेळाडू ठरला आहे.

आर्यनचे कुटुंबच कबड्डीमय आहे. वडील अशोक ढवळे आणि आई नम्रता ढवळे दोघेही आपल्या काळातील उत्तम कबड्डीपटू होते. घरातूनच मिळालेला खेळाचा वारसा आणि शिस्त आर्यनच्या यशाचा पाया ठरली. वडिलांनी दिलेली खेळाची शिस्त आणि आईने घेतलेली अहोरात्र मेहनत यामुळे आर्यनचा प्रवास घडला. बालपणापासूनच मातीच्या मैदानावर घाम गाळताना अनेकवेळा दुखापतींना सामोरे जावे लागले. मात्र जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्याने प्रत्येक अडथळा पार केला.

जिल्हा, राज्य आणि नंतर राष्ट्रीय स्पर्धांमध्ये त्याने सातत्याने चमकदार कामगिरी केली. विशेषत: रेडिंगमधील वेगवान चपळाई आणि डिफेन्समधील भक्कम पकड यामुळे तो प्रशिक्षकांच्या नजरेत भरला. अष्टपैलू खेळाडू म्हणून दोन्ही विभागांत सारखाच प्रभावी ठरल्याने प्रो कबड्डीच्या स्काऊट्सचे लक्ष त्याच्याकडे वळले.

सध्या आर्यन बाणेर येथील बाबूराव सोशल फाउंडेशनच्या ‘सतेज संघा’कडून नियमित सराव करतो. यावर्षी त्याने राज्यस्तरीय स्पर्धेत पुणे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले. विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेत त्याने सुवर्णपदक पटकावत आपली गुणवत्ता सिद्ध केली. मैदानावरील आक्रमकता, सामन्याचे वाचन करण्याची क्षमता आणि संघभावना यामुळे तेलुगू टायटन्स संघाने त्याच्यावर विश्वास दाखवला.

सतेज संघाचे प्रशिक्षक आणि सहकारी खेळाडूंनी आर्यन चे अभिनंदन केले. ‘आई-वडिलांनी दिलेले संस्कार आणि महाराष्ट्राच्या मातीतून मिळालेली ताकद यामुळे मी इथपर्यंत पोहोचलो. तेलुगू टायटन्सकडून खेळताना पुण्याचे, महाराष्ट्राचे आणि भारताचे नाव मोठे करायचे आहे,’ अशी भावना आर्यनने व्यक्त केली.

कष्ट, शिस्त आणि कुटुंबाच्या पाठिंब्याच्या बळावर मातीच्या मैदानातून थेट प्रो कबड्डीच्या चमकदार मॅटपर्यंत पोहोचलेला आर्यन आज राज्यातील हजारो तरुण खेळाडूंसाठी प्रेरणास्थान ठरला आहे. त्याच्या या निवडीमुळे पुणे जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील अनेक मुले कबड्डीकडे नव्या उमेदीने वळतील, असा विश्वास क्रीडा क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केला. तेलुगू टायटन्स संघातून खेळताना आर्यनची कामगिरी कशी होते याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. पुणे जिल्ह्याच्या या युवा खेळाडूला पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

# नांदेडच्या सुरज एगंडेच्या पुस्तकातून दलित इतिहास प्रकाश झोतात

## आंबेडकरी चळवळीच्या अंतरंगाचाही पुस्तकातून उलगडा



**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**नांदेड - प्रतिनिधी**
**शिलरतन लोखंडे**

**नांदेड :** नांदेडचा युवा लेखक ‘सुरज मिलिंद एगंडे ‘ लिखित ’जात : एक जागतिक कथा ’ या नव्या पुस्तकातून जगातील सुमारे १५ देशामधील दलित इतिहास प्रकाशझोतात आला आहे. गेल्या देशभरात वांशिक आणि विविध ऐतिहासिक संदर्भ तसेच पुर्व संशोधनाचा आधार घेत प्राचीन काळापासून ते आजपर्यंत ‘जाती आणि वंशाचा तुलनात्मक उलगडा ’ या नव्या पुस्तकातून करण्यात आला आहे.

‘पेंग्विन रॅंडम हाऊस इंडिया’ ने प्रकाशित केलेल्या ‘जात : एक जागतिक कथा’ या पुस्तकात विविध द्विपसमुहावर वास्तव्यास असललेल्या दलितांचे अनुभव कथन केले आहेत. १९ व्या शतकत कॅरेबियन क्षेत्रात गिरमिटीचा मजुरापासून ते आजपर्यंतच्या मध्य- पुर्वतील शरणार्थी श्रमिकांच्या भीषण, स्थितीचे वास्तव लेखक सुरज यांनी मांडले आहे. जगभरात जातीचा वसाहतवाद, धर्म आणि राष्ट्रवादाची भूमिका यावर ‘ जात : एक जागतिक कथा ‘ या पुतकात प्रकाश टाकण्यात आला आहे. तसेच इतर ठिकाणीसुद्धा जात.

**आंबेडकरवादी कार्यकर्ते अशी ओळख..**

डॉ. सुरज एगंडे (१९८८) हे एक भारतीय संशोधक मानवाधिकार कार्यकर्ते आंबेडकरवादी सामाजिक कार्यकर्ते वकील लेखक आहेत ते मुळचे नांदेडचे असून अमेरिकेतील विश्वविख्यात हावर्ड विद्यापिठात संशोधन करीत आहेत. सुरज एगंडे हे भारतातील आघाडीचे विचारवंत आणि जातीव्यवस्थेचे अभ्यासक आहेत. ते ‘कास्ट मॅटर्स’ या पुस्तकाचे लेखक आणि ‘द रॅडिकल इन आंबेडकरचे’ सहसंपादक आहेत. जात विरोधी आंदोलनातून शोध घेण्याचा लेखक ‘सुरज यांनी प्रयत्न केला. ग्रीकां पासून ते ब्रिटिश व इस्लामिक स्थलांतरीपर्यंत विदेशी लोकांनी केलेल्या जातीय धारणेचा ठळक उल्लेख या पुस्तकात आहे तसेच दलित पॅथर या आंबेडकरीवादी चळवळीच्या अंतरंगाचा.. या पुस्तकातून उलगडा करण्यात आला आहे .या पुस्तकात लिहीलेल्या अनुभवातुन अवलोकन करावे.

# वादळी वाऱ्याचा तडाखा

## सातेफळ येथील शेतकऱ्याच्या सोलार यंत्रणेचे मोठे नुकसान

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**वसमत - प्रतिनिधी**
**बालाजी अडकीने**



**वसमत :** काल रात्री च्या सुमारास वसमत तालुक्यासह परिसरात आलेल्या जोरदार वादळी वाऱ्याने अनेक शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान केले. उभी पिके, फळबागा आणि शेतीसाठी उभारण्यात आलेल्या सोलार यंत्रणांनाही या वादळाचा मोठा फटका बसला आहे. वसमत तालुक्यातील सातेफळ येथील शेतकरी ज्ञानदेव कीशनराव अंभोरे यांच्या शेतातील सोलार पंपाची यंत्रणा वादळी वाऱ्यामुळे गंभीररीत्या नुकसानग्रस्त झाली. सोलार पॅनल, स्टॅंड आणि इतर साहित्याचे मोठे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे.

आधीच शेतीमालाला योग्य भाव मिळत नसताना नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. वर्षभर कष्ट करून उभे केलेले पीक आणि शेतीसाठी उभारलेली सोलार यंत्रणा काही क्षणांत उद्ध्वस्त झाल्याने शेतकरी हतबल झाला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करून शासनाने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी परिसरातील शेतकरी करत आहेत.

# हिमालय वुड बॅज प्रशिक्षणात लातूर जिल्ह्याची मानाची भरारी

## भारत स्काऊट्स आणि गाईड्सच्या सर्वोच्च प्रशिक्षणात तीन स्काऊट नेत्यांचे यश; राष्ट्रीय स्तरावर कौशल्याची छाप

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**उदगीर - प्रतिनिधी**
**अविनाश देवकते**



सचिन सुरवसे



बालाजी सुगावे



प्रमोद कटके

**लातूर (उदगीर) :** भारत स्काऊट्स आणि गाईड्सच्या अत्यंत प्रतिष्ठित व सर्वोच्च समजल्या जाणाऱ्या ‘हिमालय वुड बॅज’ प्रशिक्षणामध्ये लातूर जिल्ह्यातील तीन स्काऊट नेत्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. लातूर येथील भारत स्काऊट व गाईड कार्यालयातील वरिष्ठ लिपिक सचिन सुधाकर सुरवसे, शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, हंडरगुळी (ता.उदगीर) येथील स्काऊट मास्टर बालाजी चंद्रकांत सुगावे आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिवणी (बु.) (ता. औसा) येथील स्काऊट मास्टर प्रमोद नरसिंग कटके यांनी हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले.

दि. १३ मे ते १९ मे २०२६ या कालावधीत राष्ट्रीय प्रशिक्षण केंद्र (एन.टी.सी.), पचमढी (मध्य प्रदेश) येथे आयोजित सात दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिरात देशभरातील निवडक स्काऊट नेते सहभागी झाले होते. या शिबिरामध्ये सहभागी प्रशिक्षणार्थींना प्रगत नेतृत्व कौशल्य, आपत्कालीन व्यवस्थापन, साहसी उपक्रम आणि संघटनात्मक कार्यपद्धती यांचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले.

‘हिमालय वुड बॅज’ हे भारत स्काऊट्स आणि गाईड्सच्या युनिट लीडर्ससाठी दिले जाणारे सर्वोच्चस्तरीय प्रशिक्षण मानले जाते. या प्रशिक्षणामध्ये कॅम्पक्राफ्ट (शिबिर व्यवस्थापन), टेंट पिचिंग (तंबू उभारणी), मॅपिंग (नकाशा तयार करणे), पायोनियरिंग प्रकल्प, प्रथमोपचार, निसर्ग संवर्धन, हायकिंग तसेच समुदाय विकासाशी संबंधित उपक्रमांचा समावेश होता. प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष मैदानी उपक्रमांद्वारे नेतृत्वगुण विकसित करण्यावर विशेष भर देण्यात आला. या यशासाठी माध्यमिक शिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, प्राथमिक शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, जिल्हा संघटक डॉ. शंकर चामे, विजयकुमार शुक्ला (एल.टी.), मध्य प्रदेश, मनोजकुमार रॉय (ए.एल.टी.), पश्चिम बंगाल, लक्ष्मण शुक्ला (ए.एल.टी.), दिल्ली, विपिनकुमार मिश्रा (ए.एल.टी.), उत्तर प्रदेश, नंदलालजी (ए.एल.टी.), राजस्थान, सहाय्यक राज्य प्रशिक्षण आयुक्त गोविंद केंद्रे, सौदागर एच.एन. (ए.एल.टी.), धोंडीराम पाटील आणि राधाकिशन जोगदंड यांचे मार्गदर्शन लाभले. लातूर जिल्ह्यातील या तीन स्काऊट नेत्यांच्या यशामुळे जिल्ह्याच्या शैक्षणिक व स्काऊट चळवळीच्या कार्याला नवी उंची प्राप्त झाली असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# दिव्यांग शासनाच्या दारी मालेगांव तहसील कार्यालयावर एल्गार!

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**मालेगाव - प्रतिनिधी**
**लकी रोकडे जैन**

✽ प्रलंबित अनुदानासह ८ प्रमुख मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना सादर
✽ मार्च-एप्रिलचे मे टेम्परवारी दिव्यांग याचे अनुदान तात्काळ जमा करण्याची मागणी
✽ ५ टक्के दिव्यांग निधीचा हिशोब जाहीर करा
✽ घरकुल, ट्रायसायकल, स्वयंरोजगार, घरटॅक्स सवलत व वार्षिक भत्ता वाढविण्याची मागणी
✽ दिव्यांग राखीव आमदार निधी पण योग्य पद्धतीने खर्च करण्यात यावा!



**मालेगाव :** दिव्यांग बांधवांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत आज मालेगाव तहसील कार्यालयात दिव्यांग बांधवांच्या वतीने तहसीलदार यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. शासनाकडून मिळणारे मार्च व एप्रिल महिन्याचे आर्थिक अनुदान अद्यापही लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झाले नसल्याने दिव्यांग नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. निवेदनात नमूद करण्यात आले की, शासनामार्फत मिळणारे आर्थिक अनुदान हे अनेक दिव्यांग कुटुंबांसाठी जगण्याचा आधार असून, या निधीवरच त्यांचा औषधोपचार, प्रवास, शिक्षण आणि दैनंदिन खर्च अवलंबून असतो. मात्र दोन महिन्यांपासून अनुदान न मिळाल्याने अनेक दिव्यांगांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून प्रलंबित अनुदान जमा करावे, अशी मागणी करण्यात आली. यावेळी दिव्यांग बांधवांनी शासन निर्णयानुसार नगरपंचायतच्या एकूण उत्पन्नातील ५ टक्के निधी दिव्यांग कल्याणासाठी खर्च करणे बंधनकारक असल्याचे सांगत खालील ८ प्रमुख मागण्या प्रशासनासमोर ठेवल्या.

१) दिव्यांग निधीचा संपूर्ण तपशील जाहीर करावा

चालू आर्थिक वर्षात दिव्यांगांसाठी किती निधी राखीव ठेवण्यात आला आहे व तो कोणत्या योजनांवर खर्च करण्यात येणार आहे, याची सविस्तर माहिती सार्वजनिक करावी.

२) साधनसामग्रीचे तात्काळ वाटप करावे

पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना ट्रायसायकल, श्रवणयंत्र, व्हीलचेअर व इतर आवश्यक साहित्याचे त्वरित वाटप करण्यात यावे.

३) घरकुल योजनांमध्ये प्राधान्य द्यावे

प्रधानमंत्री आवास योजना व इतर घरकुल योजनांमध्ये दिव्यांग बांधवांना विशेष प्राधान्य देऊन घरकुल मंजूर करावे. स्वत:ची जागा किंवा भूखंड असलेल्या दिव्यांगांना शासन नियमानुसार घर बांधून देण्याची व्यवस्था करावी.

४) घरटॅक्समध्ये सवलत द्यावी

दिव्यांग व्यक्तींच्या घरांना मालमत्ता करामध्ये विशेष सवलत देऊन आर्थिक भार कमी करावा.

५) स्वयंरोजगारासाठी जागा व गाळे उपलब्ध करावेत

नगरपरिषद हद्दीत दिव्यांगांना व्यवसाय सुरू करण्यासाठी जागा किंवा गाळे आरक्षित करून उपलब्ध करून द्यावेत.

६)स्टॉलसाठी आरक्षित जागा द्यावी

दिव्यांग बांधवांना स्वावलंबी बनविण्यासाठी नगरपरिषद हद्दीत किमान २००० चौ.फुट जागा किंवा स्टॉलसाठी आरक्षित क्षेत्र उपलब्ध करून द्यावे.

७) वार्षिक आर्थिक भत्ता वाढवावा.

सध्या मिळणारा वार्षिक भत्ता महागाईच्या तुलनेत अत्यल्प असल्याने प्रत्येक दिव्यांग व्यक्तीस नगरपरिषदेकडून किमान रु. ५,००० वार्षिक आर्थिक सहाय्य देण्यात यावे.

८) योजनांमध्ये पारदर्शकता आणावी

दिव्यांगांसाठी राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी माहितीपत्रके प्रसिद्ध करावीत व लाभार्थ्यांना वेळोवेळी माहिती द्यावी. निवेदन सादर करताना दिव्यांग बांधवांनी प्रशासनाने केवळ आश्वासनांवर न थांबता प्रत्यक्ष कार्यवाही करून दिव्यांगांच्या न्याय्य मागण्या पूर्ण कराव्यात, अशी मागणी केली. तहसीलदारांनी निवेदन स्वीकारून संबंधित विभागांकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिल्याचे यावेळी सांगण्यात आले.

दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांबाबत प्रशासनाने संवेदनशीलता दाखवत तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# एसटी महामंडळाचा ७८ वा वर्धापन दिन शिऊर येथे उत्साहात साजरा

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**वैजापूर - प्रतिनिधी**
**अरविंद पवार**



**शिऊर :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त शिऊर बसस्थानक येथे उत्साहपूर्ण वातावरणात छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी एसटीच्या प्रवासी सेवेचा गौरव करण्यात आला तसेच महामंडळाच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या. कार्यक्रमाला वाहतूक नियंत्रक राजू विसपुते, ज्येष्ठ नागरिक रामकृष्ण खरोटे, धनंजय चुडीवाल, प्रशांत भागवत, बाळू पवार, सुनील खरोटे, तसेच लोकमतचे पत्रकार विजय जाधव व साळुंखे साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी एसटी महामंडळाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या प्रवासाचा आढावा घेतला. ग्रामीण भागातील नागरिक, विद्यार्थी, शेतकरी, कामगार तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी एसटी ही केवळ वाहतुकीचे साधन नसून ग्रामीण जनतेची खरी जीवनवाहिनी असल्याचे त्यांनी नमूद केले. दुर्गम गावांपर्यंत पोहोचून सर्वसामान्यांना परवडणारी, सुरक्षित व विश्वासार्ह सेवा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य एसटी महामंडळाने सातत्याने केले असल्याचेही वक्त्यांनी सांगितले. महामंडळातील अधिकारी, कर्मचारी, चालक व वाहक यांच्या कर्तव्यनिष्ठ सेवेमुळे लाखो प्रवाशांचा प्रवास दररोज सुरक्षित व सुलभ होत असल्याबद्दल त्यांचे कौतुक करण्यात आले. तसेच आगामी काळातही एसटी महामंडळाने अधिक आधुनिक, प्रवासी-केंद्रित आणि गुणवत्तापूर्ण सेवा देत प्रगतीची नवी शिखरे गाठावीत, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली.

कार्यक्रमात उपस्थितांनी एकमेकांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा देत एसटी महामंडळाच्या यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. शिऊर बसस्थानक परिसरात झालेल्या या कार्यक्रमामुळे वर्धापन दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.





# राजमाता आहिल्याबाईंच्या विचारांचा जागर बोईसरमध्ये ३०१ वी जयंती उत्साहात साजरी

## व्याख्यान, प्रबोधन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि हळदी-कुंकू उपक्रमातून इतिहासाचे स्मरण; विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
पालघर - प्रतिनिधी
मिलिंद चुरी



**बोईसर :** पुण्यश्लोक राजमाता आहिल्याबाई होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त बोईसर येथे आयोजित करण्यात आलेला जयंती उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. पुण्यश्लोक राजमाता आहिल्याबाई होळकर सामाजिक प्रतिष्ठान, बोईसर-पालघर यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पालघर लोकसभेचे खासदार डॉ. हेमंत सावरा उपस्थित होते. याशिवाय शिवसेना जिल्हाध्यक्ष कुंदन संखे, शिवशक्ती सामाजिक संघटनेचे संजय पाटील, सचिन लोखंडे, जनार्दन चांदणे, शिवशंभो प्रतिष्ठानचे महेश नागणे, इंजि. संतोष सातपुते, डॉ. स्मिता माळवदकर, डॉ. शालिनी पाटील, रंजना संखे, वैशाली शादुलवाड यांच्यासह अनेक मान्यवरांनी कार्यक्रमास उपस्थित राहून राजमातांना अभिवादन केले. राजमाता आहिल्याबाई होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा आणि पराक्रमी इतिहासाचा परिचय नव्या पिढीपर्यंत पोहोचावा या उद्देशाने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख वक्ते म्हणून पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रकाश हसनाळकर यांनी आहिल्याबाईंच्या लोककल्याणकारी प्रशासनाची, न्यायप्रियतेची आणि राष्ट्रनिर्मितीतील योगदानाची माहिती उपस्थितांना दिली. यावेळी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध खंजिरीवादक सत्यपाल महाराज चिचोंलीकर यांनी खंजिरी भजन आणि प्रबोधनात्मक सादरीकरणातून समाजजागृतीचा संदेश दिला. त्यांच्या प्रभावी शैलीमुळे उपस्थितांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमानंतर महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला महिलांचा मोठा प्रतिसाद लाभला. सामाजिक ऐक्य, सांस्कृतिक परंपरा आणि समाजप्रबोधन यांचा संगम साधणाऱ्या या सोहळ्याचे उपस्थितांनी कौतुक केले. या जयंती उत्सवाचे आयोजन प्रतिष्ठानचे राजुदादा आखाडे, गोपीचंद वडितके, चक्रधर बावस्कर, प्रमोद कंकरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. सुयोग्य नियोजन, शिस्तबद्ध व्यवस्था आणि स्नेहभोजनाच्या आयोजनामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत प्राप्त झाली. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. राजमाता आहिल्याबाई होळकर यांच्या कार्यातून समाजसेवा, सुशासन आणि लोककल्याणाचा आदर्श घेण्याचा संदेश या जयंती उत्सवातून देण्यात आला.

# लाखोंची इमारत धूळखात; जळालेल्या बॅटऱ्या गायब!

## गुडसूर प्राथमिक आरोग्य केंद्रातील शॉर्टसर्किट प्रकरणावर संशयाचे सावट

### सहा महिने उलटले तरी चौकशीचा पत्ता नाही, ग्रामस्थांचा संतप्त सवाल

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
उदगीर - प्रतिनिधी
अविनाश देवकते



**उदगीर :** ग्रामीण भागातील नागरिकांना गावातच दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने शासनाने लाखो रुपयांचा निधी खर्च करून उभारलेले गुडसूर (ता.उदगीर) येथील नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र आज अक्षरशः धूळखात पडले आहे. मोठ्या गाजावाजात सुरू झालेल्या या केंद्राला अवघ्या काही दिवसांत कुलूप लागले असून सहा महिन्यांपासून ते बंद अवस्थेत असल्याने शासनाच्या निधीचा हा उघड उघड अपव्यय असल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये सुरूआहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ८ जानेवारी २०२६ रोजी रात्री आरोग्य केंद्रातील सौर ऊर्जा यंत्रणेच्या बॅटऱ्यांमध्ये तांत्रिक बिघाड होऊन शॉर्टसर्किट झाले. या घटनेत केंद्रातील संपूर्ण वायरिंग जळून खाक झाली. बॅटऱ्यांमधून मोठमोठ्याने आवाज येऊ लागल्याने येथील कर्मचारी आणि नागरिकांनी तातडीने अग्निशामक दलाला पाचारण केले. रात्री साडेअकराच्या सुमारास आग आटोक्यात आणण्यात आली. मात्र तोपर्यंत दहा बॅटऱ्या आणि इन्व्हर्टर जळून नष्ट झाल्याची माहिती समोर आली.

धक्कादायक बाब म्हणजे, ही घटना ८ जानेवारी रोजी घडली असताना याबाबतची माहिती वाढवणा पोलीस ठाण्यात तब्बल २८ मार्च २०२६ रोजी देण्यात आल्याचे समोर आले आहे. घटनेनंतर जवळपास अडीच महिन्यांनी माहिती देण्यामागचे कारण काय? इतका विलंब का झाला? हा प्रश्न आता ग्रामस्थ विचारत आहेत. याहून गंभीर बाब म्हणजे या संपूर्ण प्रकरणाचा गुन्हा दाखल झाला की नाही, पंचनामा करण्यात आला की नाही, नुकसानाचे अधिकृत मूल्यांकन झाले की नाही, याबाबत आरोग्य विभागाकडून कोणताही स्पष्ट खुलासा करण्यात आलेला नाही. जर पंचनामा झाला असेल तर तो घटनेच्या दिवशी करण्यात आला की नंतर? की फक्त कागदोपत्री औपचारिकता पूर्ण करण्यात आली? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे अद्याप अनुत्तरित आहेत.

### सात प्रश्न अनुत्तरित; संशय आणखी गडद

गुडसूर प्राथमिक आरोग्य केंद्रातील शॉर्टसर्किट आणि जळीत प्रकरणाबाबत अनेक प्रश्न अद्याप अनुत्तरित आहेत.

* आग ८ जानेवारी २०२६ रोजी लागली, मग पोलिसांना माहिती देण्यासाठी २८ मार्चपर्यंत प्रतीक्षा का?
* घटनेची तत्काळ नोंद झाली होती का? की नंतर कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करण्यात आली?
* या प्रकरणात एफआयआर दाखल झाला की नाही?
* घटनास्थळी पंचनामा नेमका कधी करण्यात आला?
* जळालेल्या दहा बॅटऱ्या व इन्व्हर्टर सध्या कुठे आहेत?
* ते साहित्य हटविताना ग्रामपंचायत, स्थानिक नागरिक किंवा कर्मचाऱ्यांची नोंद व स्वाक्षरी घेण्यात आली होती का?
* सहा महिने उलटूनही वायरिंग दुरुस्तीचे काम का झाले नाही?

या प्रश्नांची अधिकृत उत्तरे मिळत नसल्याने ग्रामस्थांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण झाले असून संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

घटनास्थळी जळालेल्या बॅटऱ्या, इन्व्हर्टर किंवा इतर साहित्य सध्या दिसत नसल्याने संशय अधिकच बळावत आहे. जळालेल्या बॅटऱ्या नेमक्या कुठे गेल्या? त्या कोणाच्या ताब्यात देण्यात आल्या? त्या हलविताना ग्रामपंचायत, स्थानिक नागरिक किंवा संबंधित कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या होत्या का? याबाबत कोणती नोंद उपलब्ध आहे का? अशा प्रश्नांनी गावात चर्चेला उधाण आले आहे. दरम्यान, शॉर्टसर्किट होऊन सहा महिने उलटले तरी जळालेली वायरिंग बदलण्याचे काम झालेले नाही. परिणामी लाखो रुपयांची सुसज्ज इमारत वापराविना पडून आहे. ग्रामीण नागरिकांना मिळणाऱ्या आरोग्य सुविधांवर याचा थेट परिणाम होत असून रुग्णांना इतरत्र धाव घ्यावी लागत आहे.

एकीकडे शासन ग्रामीण आरोग्य सुविधांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करीत आहे, तर दुसरीकडे उभारलेल्या इमारती वापराविना पडून राहत असतील तर त्या निधीचा नेमका लाभ कोणाला होत आहे, असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत.

या प्रकरणात जिल्हा आरोग्य प्रशासनाने संपूर्ण घटनेची स्वतंत्र चौकशी करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी, जबाबदार अधिकाऱ्यांची भूमिका स्पष्ट करावी आणि बंद पडलेले आरोग्य केंद्र तातडीने सुरू करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून जोर धरूलागली आहे. सध्या मात्र गुडसूर आरोग्य केंद्राच्या जळीत प्रकरणाभोवती प्रश्नच प्रश्न निर्माण झाले असून उत्तर मात्र एकाही प्रश्नाचे मिळत नसल्याने संपूर्ण प्रकरणावर संशयाचे गडद सावट पसरले आहे.

# जागतिक युद्धजन्य परिस्थितीमुळे सर्वच क्षेत्रात महागाईचा भडका

## शेतकरी, बांधकाम व्यावसायिक आणि उद्योग क्षेत्र चिंतेत

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
दौंड - प्रतिनिधी
अंकुश काळे

**दौंड :** सध्या देशासह राज्यात महागाईने सर्वसामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले असून जागतिक युद्धजन्य परिस्थिती, इंधन दरवाढ, पुरवठा साखळीतील अडथळे आणि डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण यामुळे सर्वच क्षेत्रांवर मोठा परिणाम होताना दिसत आहे. विशेषतः शेतकरी, बांधकाम व्यावसायिक, औद्योगिक क्षेत्र आणि सामान्य ग्राहक वाढत्या दरांमुळे वैतागले आहेत. अलीकडे प्रसिद्ध झालेल्या बांधकाम साहित्याच्या दरवाढीच्या अहवालानुसार, पुणे ग्रामीण परिसरातील आणि राज्यातील अनेक भागांत बांधकाम खर्च प्रति चौरस फूट तब्बल ५०० रुपयांनी वाढल्याचे समोर आले आहे. सिमेंट, स्टील, विटा, टाइल्स, पीव्हीसी पाइप, इलेक्ट्रिकल साहित्य आणि सॅनिटरी फिटिंग यांच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे घरबांधणीचे स्वप्न पाहणाऱ्या मध्यमवर्गीय नागरिकांनाही आर्थिक ताण सहन करावा लागत आहे.

**बांधकाम साहित्याच्या दरात मोठी वाढ**

प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीनुसार:

स्टीलच्या दरात प्रतिटन सुमारे १२ हजार रुपयांपर्यंत वाढ

पीव्हीसी आणि सीपीव्हीसी पाइपमध्ये २५ टक्क्यांपर्यंत वाढ

इलेक्ट्रिकल केबल आणि वायरमध्ये १० टक्क्यांपेक्षा अधिक वाढ

बांधकामासाठी लागणाऱ्या सॅनिटरी फिटिंगमध्ये २१ टक्के वाढ

ॲल्युमिनियम स्लायडिंग व विंडोज साहित्यामध्ये १५ टक्क्यांपर्यंत वाढ

यामुळे छोट्या गृहप्रकल्पांपासून मोठ्या निवासी व व्यावसायिक इमारतींचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. काही महिन्यांपूर्वी प्रति चौरस फूट २८०० ते ३००० रुपये असलेला खर्च आता ३५०० रुपयांपेक्षा अधिक झाल्याचे बांधकाम व्यावसायिक सांगत आहेत.

**शेतकरीही संकटात**

महागाईचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत असून खत, बियाणे, औषधे, ट्रॅक्टर डिझेल, वीजबिल आणि सिंचन खर्च प्रचंड वाढला आहे. पेरणीपासून काढणीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर खर्च वाढल्याने उत्पादन खर्च वाढत आहे; मात्र शेतीमालाला त्यानुसार हमीभाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडत आहेत.

डिझेलच्या दरवाढीमुळे ट्रॅक्टर, पंप आणि वाहतूक खर्चही वाढला आहे. त्यामुळे शेतीमाल बाजारात पोहोचविणे अधिक महाग झाले आहे. अनेक शेतकरी कर्जबाजारी होत असून सरकारने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

**औद्योगिक क्षेत्रावरही परिणाम**

इंडस्ट्रियल क्षेत्रात कच्चा माल, वीज, वाहतूक आणि उत्पादन खर्च वाढल्याने अनेक लघुउद्योग अडचणीत आले आहेत. निर्यात-आयात प्रक्रियेत युद्धामुळे निर्माण झालेल्या अडथळ्यांचा परिणाम उद्योगांवर होत आहे. काही कारखान्यांनी उत्पादन कमी केले असून रोजगारावरही त्याचा परिणाम दिसू लागला आहे.

उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, आंतरराष्ट्रीय स्तरावरील युद्ध आणि अस्थिरतेमुळे कच्च्या तेलाच्या किंमती वाढत आहेत. त्याचा थेट परिणाम वाहतूक, वीज निर्मिती आणि उत्पादन क्षेत्रावर होत आहे.

**सर्वसामान्य नागरिक त्रस्त**

दररोज वापराच्या वस्तू, घरभाडे, प्रवास, शिक्षण आणि आरोग्य सेवांच्या खर्चात वाढ झाल्याने सामान्य नागरिकांचे मासिक बजेट कोलमडले आहे. 'उत्पन्न तेवढेच आणि खर्च दुप्पट' अशी भावना अनेक नागरिक व्यक्त करत आहेत.

**तज्ज्ञांचे मत**

अर्थतज्ज्ञांच्या मते, जागतिक युद्धजन्य परिस्थिती दीर्घकाळ राहिल्यास महागाई आणखी वाढू शकते. केंद्र व राज्य सरकारने इंधनावरील कर कमी करणे, बांधकाम साहित्याच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवणे आणि शेतकरी व उद्योगांना विशेष सवलती देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

सध्या सर्वच क्षेत्रात वाढती महागाई ही मोठी चिंता बनली असून सामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी ठोस आर्थिक धोरणांची गरज असल्याचे चित्र दिसत आहे.

# नांदेड विधानपरिषद निवडणुकीत उमेदवारीवरून खळबळ

## ज्योतिबा खराटेंच्या नावाला कार्यकर्ते आग्रही

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
किनवट - प्रतिनिधी
शुभम शिंदे



**किनवट :** राज्यभरात विधानपरिषद निवडणुकांची लगबग सुरू झाली असून नांदेड जिल्ह्यातील राजकारणालाही वेग आला आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या वाट्याला आलेल्या या जागेसाठी उमेदवारीवरून पक्षांतर्गत हालचाली सुरू झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे सुपुत्र कृष्णा पाटील आष्टीकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मात्र, स्थानिक पातळीवर शिवसैनिकांचा कल माजी जिल्हा परिषद सदस्य ज्योतिबा दादा खराटे यांच्या बाजूने झुकत असल्याचे दिसून येत आहे. ज्योतिबा खराटे यांनी शाखाप्रमुखापासून जिल्हाप्रमुखापर्यंतचा प्रवास करत संघटन उभारणीसाठी सातत्याने काम केले आहे. शिवसेनेत फूट पडलेल्या काळात अनेकांनी पक्ष सोडला असताना त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत पक्षाशी निष्ठा कायम राखली. त्यांच्या या भूमिकेचा प्रत्यय किनवट नगर परिषद निवडणुकीत आला. पूर्वी भाजपच्या ताब्यात असलेली किनवट नगर परिषद त्यांनी आपल्या राजकीय कौशल्य, संघटनशक्ती आणि प्रभावी जनसंपर्काच्या जोरावर शिवसेनेकडे आणत भगवा फडकवला आणि सुजाता एंड्रलवार ह्या नगराध्यक्ष झाल्या. या विजयामुळे त्यांच्या नेतृत्वक्षमतेला स्थानिक पातळीवर बळकटी मिळाल्याचे मानले जाते.

दरम्यान, किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघातील राजकीय समीकरणेही या चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहेत. शिवसेना-भाजप युतीच्या काळात युतीधर्म पाळल्यामुळे ही जागा वेळोवेळी भाजपकडे गेली होती. २०१९ तसेच २०२४ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपचे आमदार भीमराव केराम यांनी विजय मिळवत या मतदारसंघात आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. त्यांनी संघटन आणि जनसंपर्काच्या जोरावर किनवट-माहूर मतदारसंघ भाजपचा बालेकिल्ला बनवला. गेल्या अनेक वर्षांपासून या मतदारसंघातील निवडणूक ही आमदार भीमराव केराम आणि माजी आमदार स्वर्गीय प्रदीप नाईक यांच्यातच होत होती. बंजारा समाजाचा पाठिंबा असलेल्या प्रदीप नाईक यांनी तीन वेळा आमदारकी मिळवली होती, तर आदिवासी समाजाच्या पाठबळावर भीमराव केराम यांनी आपले स्थान मजबूत केले. मात्र, स्वर्गीय प्रदीप नाईक यांच्या निधनानंतर या मतदारसंघात तुल्यबळ प्रतिस्पर्धी उरला नसल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर, विधानपरिषदेची उमेदवारी ज्योतिबा खराटे यांना मिळाल्यास भविष्यात किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघात ते एक सक्षम पर्याय म्हणून उदयास येऊ शकतात, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. त्यांच्या जनसंपर्क आणि संघटनशक्तीच्या जोरावर बंजारा व आदिवासी समाजातील समीकरणांमध्ये बदल घडवण्याची क्षमता असल्याचेही बोलले जात आहे.

दरम्यान, नांदेड जिल्ह्यात सध्या जिल्हा परिषद व पंचायत समिती अस्तित्वात नसल्यामुळे या निवडणुकीत केवळ नगरसेवक मतदान करणार आहेत. त्यामुळे स्थानिक पातळीवरील समीकरणांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. या सर्व घडामोडींमुळे नांदेड विधानपरिषदेची निवडणूक केवळ उमेदवारीपुरती मर्यादित न राहता आगामी विधानसभा राजकारणाची दिशा ठरवणारी ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आता पक्षप्रमुख उद्धव ठाकरे उमेदवारीबाबत कोणता निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सरवटकर परिवार यांच्या निवासस्थानी पुण्यानुमोदन कार्यक्रम संपन्न

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
अमरावती - प्रतिनिधी

**अमरावती :** कुष्टा बु. येथील माजी सरपंच्या कमलताई लक्ष्मण सरवटकर यांचे नुकतेच परतवाडा येथे अल्पआजाराने निधन झाले. त्यानिमित्ताने परतवाडा येथे राजेश सरवटकर यांच्या निवासस्थानी भदन्त बुद्धघोस महाथेरो, भन्ते आलोक, भन्ते सारिपूत्त, भन्ते प्रज्ञादीप व भन्ते मोगलम यांच्या उपस्थितीत पुण्यानुमोदनाचा कार्यक्रम विधिवीत संपन्न, झाला.



सर्वप्रथम भिक्खूसंघाच्या व उपासक उपासिका द्वारे कमलताई सरवटकर यांना श्रद्धांजली वाहन्यात आली नंतर बुद्धघोस महाथेरो यांच्या मार्गदर्शनात भिक्खू संघा द्वारे विधिवत पुण्यानुमोदनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

याप्रसंगी परिसरातील बौद्ध उपासक उपासिका तसेच नातेवाईक व परिवारातील सदस्य उपस्थित होते. कमलताई सरवटकर हया स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघांचे जिल्हाध्यक्ष संजय सरवटकर यांच्या काकू होत्या. शेवटी भोजनदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**सुविचार**

कुणी विचारलं आयुष्यात काय गेलं आणि काय मिळालं, सरळ सांगा की, जे गेलं ते कधीच माझं नव्हतं, जे मिळालं ते देवानं माझ्यासाठीच ठेवलं होतं...!!!!!

डॉ. विवेक टापरे
बी.डी.एस.
मो. 9096968440

ओम अॅडव्हान्स डेंटल हॉस्पीटल

डेंटल इंम्प्लांट । रुट कॅनल । ऑर्थोडोंटीक



पत्ता : राज मोहम्मद कॉम्प्लेक्स, पहनावा ड्रेसेस जवळ, मेन रोड, श्रीनगर, नांदेड.